# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020

YEAR : 45) 15th March 2020 ( No. of Pages 20 ) ( No : 02

*नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल :*

## *सन १९९२ ते २००० या काळातील नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या सेवा नियमित झाल्या म्हणजे काय झाले ? हे उच्च शिक्षण विभागाला कळायला आणखी किती वर्षे लागतील ?*

### *मा. उच्च न्यायालयाचे सात व मा. सर्वोच्च न्यायालयाचे तीन निर्णय झाल्यानंतरसुद्धा प्रकाश पडू नये हे खेदजनक होय !*

*प्रा.बी.टी.देशमुख*

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

"The principle of Parliamentary Sovereignty means neither more nor less than this, namely, that Parliament thus defined has, under the English Constitution, the right to make and unmake any law whatever; and further no person or body is recognised by the law of England as having a right to override and set aside the legislation of Parliament." - Dicey, A., Introduction to the Law of the Constitution, pp. 39-40.

*****

"It (Parliament) can, in short, do everything that is not naturally impossible." - Blackstone

*****

"Parliament can do everything but make a woman a man, and a man a woman." - De Lolme

*****

संसदीय शासन पद्धतीची जननी समजल्या जाणाऱ्या ब्रिटन मधील संसदेच्या सार्वभौमत्वाचे त्या देशातील काही घटनातज्ज्ञांनी केलेले वर्णन वर उधृत केलेले आहे. त्याचा काळजीपूर्वक विचार केला तर, त्या सार्वभौम संसदेला सुद्धा निसर्ग नियमांच्या विरोधात जाता येत नाही. कायदा करून स्त्रीचा पुरुष आणि पुरुषाची स्त्री करता येत नाही, कारण तो निसर्ग नियमाच्या विरोधात करण्यात आलेला कायदा असेल. ही गोष्ट नमूद करीत असतांना अनेकदा गंमतीने असे म्हटले जाते की, यापुढे स्त्रीला पुरुष आणि पुरुषाला स्त्री म्हणावे असा कायदा ब्रिटनच्या संसदेला करता येईल. वरील म्हणणे गंमतीचे असले तरी त्याच्या गाभ्यातील भाग असा आहे की, निसर्ग नियमांच्या विरोधात जाईल असा कोणताही कायदा ती संसद करणार नाही. हे पहिले बंधन असून आपल्याला कोणी 'येडपट' म्हणणार नाही याची काळजी घेणे हे दुसरे बंधन म्हणून तेथे मानले जाते.

**१.२** राज्य शासनाच्या स्तरावर कायदा, उप कायदा, नियम व उप-नियम करण्यावर सुद्धा अनेक मर्यादा येतात. त्यातील प्रमुख मर्यादा अर्थात निसर्ग नियमांच्या (natural laws) आहेत. उदाहरण म्हणून द्यावयाचे झाल्यास १९९२ ते १९९९ या काळात जन्माला आलेल्या एखाद्या मुलाला २०१३ साली कायदा करून "**२०१३ नंतर तो जन्मलेला आहे असे समजावे**" असा कायदा राज्यशासनाला करता येणार नाही, कारण ते निसर्ग नियमाच्या विरुद्ध तर आहेच पण वेडसरपणाचे सुद्धा आहे.

**१.३** सन १९९२ ते २००० या कालखंडामध्ये विधिवतरित्या सेवेत आलेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांना वार्षिक वेतनवाढी सह (आश्वासित प्रगती योजनेचा लाभ सोडून) इतर सर्व लाभ मिळत होते. दिनांक २७ जून २०१३ रोजीच्या शासननिर्णयाने त्यांना आश्वासित प्रगती योजनेच्या लाभापासून वंचित ठेवले, इतकेच नव्हे तर नव्या पेन्शन योजनेचे घोंगडे सुद्धा त्यांच्या गळ्यामध्ये अडकविण्यात आले. सन १९९२ ते २००० या काळातील त्यांच्या सेवा नियमित करण्याच्या नावाखाली त्या सेवांकडे पूर्णतः दुर्लक्ष करून शासननिर्णय निघाल्यापासून त्यांच्या सेवा धरण्याचा नियम करण्यात आला. तसेच त्यांना नव्या पेन्शन योजनेत ढकलण्यात आले. हे सर्व बेकायदेशीरपणाचे होते. या सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या सात खंडपीठांनी निर्णय दिलेले आहेत. या सात प्रकरणांपैकी निरनिराळ्या तीन प्रकरणी शासनाने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केल्या. मा.सर्वोच्च न्यायालयाने त्या सर्व विशेष अनुमती याचिका फेटाळून लावलेल्या आहेत.

**२. "विद्यापीठ अनुदान आयोगाने केंव्हा पासून सेवा धरावी याबाबतची तारीख कळविल्यानंतर आम्ही एक महिन्यात कार्यवाही करू."** असे महाराष्ट्र शासनाने वारंवार महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला आश्वासित केले होते. विद्यापीठ अनुदान आयोगाने स्पष्ट शब्दात नेमणुकीच्या दिनांकापासून त्यांची सेवा सर्व प्रयोजनार्थ धरली जावी. असे २६ ऑगस्ट २०११ च्या पत्राने कळविल्यानंतर

## Nagpur University Teachers' Association

### MEETING NOTICE : 1

**DATED : 15.03.2020**

**From :**

**Dr.Vilas Dhone**
Secretary, NUTA 14, Samruddhi Nagar,
Sewagram Road, Wardha-442 001

**To,**
All the members
of the Nagpur University Teachers' Association
Dear members,

I have the honour to inform you that the General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.Vilas Dhone,**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting 12.00 Noon on Sunday, the 17th May, 2020***

## प्रास्ताविक - प्रा.बी.टी.देशमुख

महाराष्ट्रात नेट-सेटची परीक्षा संचालन करणारे केंद्र अजून स्थापनच झालेले नाही, माझ्या विषयात नेट-सेटची परीक्षा महाराष्ट्र तर सोडाच पण भारतातसुद्धा कोठेही आजपावेतो घेण्यात आलेली नाही, कायद्यामध्ये नेट-सेट पात्रता सक्तीची म्हणून समाविष्ट करण्यात आलेली नाही, विद्यापीठाच्या निवड समितीमार्फत माझी निवड झालेली आहे, विद्यापीठाने मान्य करून दिलेल्या जाहिरातीमध्ये नेट-सेटची पात्रता सक्तीची म्हणून टाकलेली नव्हती, विद्यापीठाने माझ्या नेमणुकीला स्थायी (onward) मान्यता प्रदान केलेली आहे. विद्यापीठाच्या परिनियमाप्रमाणे दोन वर्षांच्या सेवेनंतर मला कन्फर्म करण्यात आलेले आहे. ३१ मार्च १९९४ पर्यंत नेट-सेट पात्रता प्राप्त केली नाही तर सेवेतून काढून टाकण्यात येईल असे मला ७ मार्च १९९४ ला कळविण्यात आले आहे, आता ३१ मार्च १९९५ पर्यंत ही मुदत त्यांनी वाढविली आहे, आता ३१ मार्च १९९६ पर्यंत नेट-सेटची पात्रता मी प्राप्त केली पाहिजे, नाही तर मला काढून टाकण्यात येईल असे मला कळविण्यात आले आहे, आता सेवेतून काढून टाकण्यात येईल ही अट काढून टाकण्यात आली आहे. पण माझी कायम झालेली सेवा ॲडहॉक समजल्या जाईल असे ते म्हणतात, ते असेही म्हणतात की, तुम्हाला वार्षिक वेतनवाढ दिली जाणार नाही, **अशा तक्रारी घेऊन अनेक शिक्षक सन १९९१ ते १९९९ या काळात संघटनेच्या कार्यालयात येत असत.**

**पुढे १०-१५ वर्षांनी** या सेवेत येण्याची तुमची पात्रता नसतांना तुमच्या नेमणुका या बेकायदेशीरपणे झालेल्या आहेत असे ते म्हणत आहेत, सहाव्या वेतन आयोगातील कोणतीही वेतनश्रेणी (सर्वात खालची सुद्धा) तुम्हाला मिळणार नाही, असा शासननिर्णयच त्यांनी काढला आहे, नेट-सेट पात्रता प्राप्त केल्यावर सहाव्या वेतन आयोगातील सर्वात खालची वेतनश्रेणी त्यांना देण्याचा विचार करण्यात येईल, तो पर्यंत हे शिक्षक आहे त्या वेतनावर काम करीत राहतील **असाही एक गळफास त्या शासननिर्णयात नमूद आहे. अशा तक्रारींचे पेव फुटले.**

उभी हयात लोकांना "ओरबाडण्यासाठीच आपल्याला सेवा करावयाची आहे अशा "थर्ड क्लास" मनोवृत्तीने काम करणाऱ्या काही अधिकाऱ्यांनी" महाराष्ट्रातील १० हजाराच्या वर संख्या असलेल्या या नेट-सेट मुक्त शिक्षकांना उभी हयात उपरोक्त दहशतीखाली शिकविण्याचे काम करण्यास भाग पाडले. आज त्यातील एखाद दुसरा शिक्षक भेटतो व सांगतो "माझी नेमणूक १९९४ सालातील आहे, पण ते मला आता नव्या पेन्शन योजनेत ढकलत आहेत." तेव्हा "उच्च शिक्षण विभागाचा पहिला नंबर लागलेला आहे, बक्षी समितीने यातील काही अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार नोंदबद्ध केलेला आहे, त्यातील काही घरी गेले आहेत, "काहींची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी" असा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे, तसा शासननिर्णय निर्गमित झाला आहे." हे ऐकून त्या शिक्षकाचे समाधान होत नाही, "अरे! पण माझ्या गळ्यात हे नव्या पेन्शन योजनेचे घोंगडे का अडकविण्यात येत आहे" या त्यांच्या प्रश्नाला कोणीही समाधानकारकपणे उत्तर देऊ शकत नाही. त्यातल्या त्यात या शिक्षकांसाठी एकच समाधानाची गोष्ट आहे, ती अशी की, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ व त्या महासंघाच्या विद्यापीठस्तरीय संलग्न संघटना ठामपणे त्यांच्या पाठीशी उभ्या आहेत.

त्याहुनही आणखी समाधानाची बाब अशी की, या देशातील न्यायव्यवस्थेने त्यांना चांगला दिलासा दिला आहे. त्यांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल व त्या प्रयोजनार्थ त्यांची सेवा नेमणुकीच्या दिवसापासून धरावी लागेल, असे निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या सात खंडपीठांनी आतापावेतो दिलेले आहेत. त्यापैकी तीन वेगवेगळ्या प्रकरणी तीन वेगवेगळ्या वेळी उच्च शिक्षण विभागाने दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका (SLP) मा.सर्वोच्च न्यायालयाने डिसमिस केलेल्या आहेत.

अनेक महिन्याचा काळ उलटून गेला तरी महाराष्ट्र शासनाच्या पातळीवर कोणताही निर्णय होत नव्हता.

**२.१** महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण खात्याने दिनांक ३१ जुलै २००९ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला एक पत्र (क्र. एनजीसी (२००८/२४३/०८)/विशि-१) पाठवून पुढील प्रमाणे कळविले होते. :- "राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी विनंती करील. आवश्यकता पडल्यास याचा पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देऊन सदर प्रलंबित कामे त्वरीत पूर्ण करून घेण्यात येईल.....विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करून कार्यवाही पूर्ण करण्यात येईल..... **विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख नमूद करेल, त्या तारखेपासून सूट देण्यात येईल."**

**२.२** त्यानंतर शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने दिनांक ७ ऑगस्ट २००९ रोजी एक अतितात्काळ परिपत्रक (क्र.संकीर्ण-२००९/(संप/०९)/विशि-१) काढून सर्व विद्यापीठांना व महाविद्यालयांना असे कळविले की, :- "राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी विनंती करील. आवश्यकता पडल्यास याचा पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देऊन सदर प्रलंबित कामे त्वरीत पूर्ण करून घेण्यात येतील..... विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबिर

ITEM NO.12 COURT NO.8 SECTION IX

# SUPREME COURT OF INDIA

**RECORD OF PROCEEDINGS : SPECIAL LEAVE PETITION (CIVIL) Diary No(s).1076/2020**

(Arising out of impugned final judgment and order dated 09-04-2019 in WP No. 755/2019 passed by the High Court of Judicature at Bombay)

The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) ***VERSUS*** Ranpise Vijaykumar Baburao & Ors. Respondent(s)

(WITH I.R. and IA No.16148/2020-CONDONATION OF DELAY IN FILING and IA No.16149/2020-EXEMPTION FROM FILING C/C OF THE IMPUGNED JUDGMENT and IA No.16150/2020-EXEMPTION FROM FILING O.T.)

**Date : 07-02-2020**

This petition was called on for hearing today.

**CORAM**

**HON'BLE DR. JUSTICE D.Y. CHANDRACHUD HON'BLE MS. JUSTICE INDU MALHOTRA**

**For Petitioner(s)** Mr. Rahul Chitnis, Adv.* Mr. Aaditya A. Pande, Adv.* Mr. Sachin Patil, AOR* **For Respondent(s)** Mr. B.H. Marlapalle, Sr. Adv.* Dr. R. R. Deshpande, AOR* Mr. Ajit Wagh, Adv.* Ms. Prabhleen Kaur, Adv.*

UPON hearing the counsel the Court made the following

**ORDER**

Delay condoned. We are not inclined to entertain the Special Leave Petition under Article 136 of the Constitution of India.The Special Leave Petition is accordingly **DISMISSED.** Pending applications, if any, are disposed of.

(SANJAY KUMAR-I) AR-CUM-PS (SAROJ KUMARI GAUR) COURT MASTER

आयोजित करून कार्यवाही पूर्ण करण्यात येईल..... **विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख नमूद करील, त्या तारखेपासून सूट देण्यात येईल.**"

**२.३** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी एका बाजूला व दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांच्यासह मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे समवेत दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीत जे निर्णय झाले त्या बैठकीच्या इतिवृत्तात परिच्छेद ५ मध्ये पुढील प्रमाणे उल्लेख आहे.:-

"विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या तरतुदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेगवेगळ्या याचिकांमध्ये (मुख्यतः याचिका क्र. : ५०२२/२००१, क्र. ५३७५/२००१, क्र. ४२६६/२००६) **वेळोवेळी पारित केलेल्या आदेशांनुसार, नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील.**"

**२.४** सन २०१० च्या याचिका क्रमांक ४९०९ मध्ये राज्यशासनाच्या वतीने दिनांक २९ मार्च २०११ रोजी १० परिच्छेदांचे एक शपथपत्र मा.नागपूर खंडपीठासमोर दाखल करण्यात आले होते. कोणत्या तारखेपासून नेट-सेट मुक्तता लागू होते याची तारीख जर विद्यापीठ अनुदान आयोगाने आम्हाला कळविली तर या शिक्षकांना स्थाननिश्चितीचे अनुषंगिक लाभ दिले जातील. असे शासनाने प्रतिज्ञेवर या शपथपत्रात नमूद केले होते. ते शब्दशः पुढील प्रमाणे :- "*In the event of supplying the date of exemption if they obtained from the University Grants Commission the consequential benefits* as *per the Career Advancement Scheme could be granted to the petitioners*" एकदा तारीख कळू द्या, राज्य शासन या शिक्षकांना स्थाननिश्चितीचे (CAS) लाभ द्यायला तयार आहे अशी हमी या शपथपत्रात पुढील शब्दात देण्यात आली होती. :- "*It* is *for the petitioners to provide the date of exemption to the State Government regarding exemption from not qualifying the NET / SET Examination. After receipt of the date* of *exemption from petitioners the State Government can very well grant benefits of Career Advancement Scheme to the petitioners*" राज्य शासनाच्या त्या शपथपत्रात परिच्छेद ९ व १० मध्ये उक्त मजकुर समाविष्ट आहे.

**२.५** त्यावेळी सन २०१० च्या याचिका क्रमांक ४९०९ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २० एप्रिल २०११ रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित केले होते. "In the above background, We direct the respondent no.5 University Grants Commission to communicate to the State Government the date when such exemption became effective as per notification dated 5/11/2008 in respect of the petitioners, within a period of three weeks from the date of communication of this order. We direct the State Government to reconsider the claims of the petitioners on receipt of communication from the University Grants Commission in respect of effective date of exemption, in accordance with law and procedure applicable in this regard at the earliest" (*P221NB13*)

**२.६.** रा.तु.म. नागपूर विद्यापीठातील ८३७ शिक्षकांच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ५ नोव्हेंबर २००८ च्या पत्रान्वये नेट-सेट पासून सूट देण्यात आल्याचे कळविले. बुधवार, दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी लक्षवेधी सूचनेच्या रुपाने हा प्रश्न विधानपरिषदेत चर्चेला आला. प्रस्तुत लेखकाने विचारलेल्या प्रश्नाला मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी सकारात्मक आश्वासन दिले. ते शब्दशः पुढीलप्रमाणे:-

"सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या तिसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, यांचे स्थान निश्चिती करणे हा यातील महत्त्वाचा प्रश्न आहे आणि ते कॅसचे काम आहे आणि **हे करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमच्या संदर्भात हे कॅसचे काम पूर्ण करावयाचे आहे त्यासाठीदेखील कॅम्प्स घेऊन येत्या दोन महिन्यात पूर्ण करावयाचे आहे. अशा प्रकारे हे एकूण सर्वच काम म्हणजे नियमित करण्याचे काम एक महिन्यात आणि त्यापुढे कॅसचे काम दोन महिन्यात असे तीन महिन्यात पूर्ण करून या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : बुधवार, दिनांक १७ डिसेंबर २००८ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १५०, क्रमांक ०३, पृष्ठ ३९२)*

**३.** उच्च व तंत्र शिक्षण विभागाने महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला दिनांक ७ मार्च २०१३ रोजी एक पत्र (क्रमांक बहिष्कार:२०१३/प्र.क्र.७१/विशि-३) पाठवून पुढीलप्रमाणे कळविले. :-

"दिनांक १९.९.१९९१ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा विर्निदिष्ट अटींच्या अधिन राहून **शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून** सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात येत आहे."

"मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री, मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण तसेच शिक्षक संघटनेच्या प्रतिनिधींसोबत दिनांक ६.२.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत **थकबाकी पोटी अदा करावयाच्या रकमेच्या अनुषंगाने रु. ५००.०० कोटीचा पहिला हप्ता मार्च, २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करून वितरीत करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे.**" (*P33NB2013*)

**३.१** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाचे दिनांक ९ मार्च २०१३ रोजीच्या बैठकीत एक तपशीलवार ठराव करून याबाबतची प्रतिक्रिया शासनाला कळविली. या ठरावाच्या परिच्छेद ५ ची सुरुवातच पुढीलप्रमाणे होती. :-

"नेटसेटमुक्त शिक्षकांबाबत व थकबाकी अदा करण्याबाबत जे निर्णय आता राज्यशासनाच्या पातळीवर घेण्यात आलेले आहेत त्याची नोकरशाहीने तयार केलेली शब्दरचना काळजीपूर्वक नजरेखालून घातल्यास अलंकारशास्त्रामध्ये अर्थालंकारातील व्याघाताची दोन सुंदर उदाहरणे या दोन निर्णयांनी दाखल झालेली आहेत असे म्हणता येईल. ती दोनही उदाहरणे पाहू" (*P38NB2013*)

ITEM NO.12 COURT NO.8 SECTION IX

# SUPREME COURT OF INDIA

**RECORD OF PROCEEDINGS : SPECIAL LEAVE PETITION (CIVIL) Diary No(s).1309/2020**

(Arising out of impugned final judgment and order dated 29-07-2019 in WP No. 2068/2019 passed by the High Court of Judicature at Bombay At Nagpur)

The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) ***VERSUS*** Rajesh Vasantrao Pande & Anr. Respondent(s)

(WITH I.R. and IA No.23767/2020-CONDONATION OF DELAY IN FILING and IA No.23768/2020-EXEMPTION FROM FILING C/C OF THE IMPUGNED JUDGMENT and IA No.23770/2020-EXEMPTION FROM FILING O.T. )

**Date : 17-02-2020**

This petition was called on for hearing today.

**CORAM**

**HON'BLE DR. JUSTICE D.Y. CHANDRACHUD HON'BLE MR. JUSTICE HEMANT GUPTA**

**For Petitioner(s)** Mr. Rahul Chitnis, Adv.* Mr. Aaditya A. Pande, Adv.* Mr. Sachin Patil, AOR* **For Respondent(s)** Mr. B.H. Marlapalle, Sr. Adv.* Mr. Yuvraj Baburao Gaikwad, Adv.* Mr. Ajit Wagh, Adv.* Ms. Prabhleen Kaur, Adv.* Dr. R. R. Deshpande, AOR*

UPON hearing the counsel the Court made the following

**ORDER**

Delay condoned. We are not inclined to entertain the Special Leave Petition under Article 136 of the Constitution of India. The Special Leave Petition is accordingly **DISMISSED.** Pending applications, if any, are disposed of.

(SANJAY KUMAR-I) AR-CUM-PS (SAROJ KUMARI GAUR) COURT MASTER

"या ठरावाच्या परिच्छेद ५ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले होते.:-

"(१) **नेटसेटबाबत :- "नेटसेटमुक्त अध्यापकांच्या सेवा नियमित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ..... शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून त्यांची सेवा सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यात येईल**" असे हे व्याघाताचे पहिले उदाहरण आहे. (हा शासननिर्णय पुढच्या आठवड्यात, पुढच्या महिन्यात, पुढच्या वर्षात किंवा केव्हातरी निर्गमित होईल) सामान्यपणे या निर्णयातील पहिले वाक्य वाचल्याबरोबर संबधितांना होणारा आनंद एका क्षणात गिळंकृत करण्याचे जे असामान्य सामर्थ्य पुढच्या वाक्यात आहे ते निश्चितच नेत्र दिपवून टाकणारे आहे. दिनांक १९ सप्टेंबर १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालखंडात महाराष्ट्रामध्ये नियमितपणे सेवेमध्ये आलेले सर्व बिगरनेटसेट अधिव्याख्याते आता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या एका निर्णयाखाली आलेले आहेत. तसे करतांना विद्यापीठ अनुदान आयोगाने यापूर्वी त्यांच्याबाबत घेतलेले वेगवेगळे निर्णय बाजूला सारून हा निर्णय घेतला व तो दिनांक १६/०८/२०११, २६/०८/२०११, १५/०३/२०१२ व दिनांक ११ मे २०१२ अशा एकामागून एक चार पत्रान्वये राज्यशासनाला कळविला. "**सदर अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यात याव्यात**" असा हा निर्णय आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या एकाच निर्णयाखाली आलेल्या अशा शिक्षकांची संख्या २३०७ असल्याचे जे आज सांगितले जात आहे ते सफेद झूट आहे. नोकरशाहीने राजकीय नेतृत्त्वाची केलेली ती सरळ सरळ दिशाभूल आहे. ही संख्या दहा हजाराच्या जवळपास असल्याची अधिकृत माहिती या (*P81NB2012*) महासंघाजवळ उपलब्ध आहे. **या सर्व शिक्षकांची सेवा १२ ते २१ वर्षे झालेली असून त्यांना वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी साठी सेवा धरण्याचा एक लाभ सोडला तर इतर सर्व लाभ (जसे वार्षिक वेतनवाढ, निवृत्तीवेतनासाठी सेवा परिगणित करणे, इत्यादी) नेमणुकीच्या दिनांकापासून आज अस्तित्वात असलेल्या कायद्याने, परिनियमांनी व शासननिर्णयांनी उपलब्ध झालेले आहेत व मिळत आहेत.** वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी सुद्धा त्यांची सेवा धरली जावी असे केंद्र शासनाचे, विद्यापीठ अनुदान आयोगाचे आदेश, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय व खुद्द महाराष्ट्र शासनाचे जिवंत शासननिर्णय असतांना महाराष्ट्रातच फक्त ही सेवा धरली जात नाही. याबद्दल आंदोलन सुरू असतांना सर्व प्रयोजनासाठी त्यांची सेवा 'उद्या'पासून धरण्याची जी शब्दरचना नोकरशाहीने रचित केली आहे, ती महम्मद तुघलकालासुद्धा लाजेने मान खाली घालायला लावणारी आहे. **परिणामी हे सर्व अध्यापक जुन्या पेन्शन योजनेतून नवीन अंशदायी पेन्शन योजनेत फेकले जातील. तशी परिणामदर्शक पट्टी त्याच दिवशी (दिनांक ६ मार्च, २०१३) चित्रवाहिन्यांवरून चमकविण्यात आली होती, हे सर्वांच्या लक्षात आहेच. सदरहू पट्टी चमकविण्याचे यापुढे होणारे विदारक परिणाम लक्षात घेवून संबंधित नोकरशाहीने ती पट्टी प्रसारणातून काढून घेतली.** त्यानंतर पुढच्या कोणत्याही कागदपत्रात ती दिसणार नाही याचीही काळजी घेण्यात आली असे दिसते. मात्र यामुळे पुढे होणारे अटळ परिणाम टळतील असे नाही. कोंबडं झाकल्यामुळे जस तांबडं फुटायच राहत नाही तशी ही पट्टी झाकून ठेवल्यामुळे अंशदायी नव्या पेन्शन योजनेचा सूर्य उगवण्याचे थांबणार थोडेच आहे? **भूतकाळातील जी सेवा मोजलीच जाणार नाही ती सेवा नियमित करण्याचा चमत्कार घडविणारा नेत्रदीपक शासननिर्णय केंव्हा निर्गमित होईल? याची वाट पाहण्याचा भाबडेपणा महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी करावा अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे.**"

३.२ महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने केलेल्या ठरावाच्या पाचव्या परिच्छेदाचा उत्तरार्ध पुढीलप्रमाणे होता. :-

"**हे 'अशा प्रकारे' केले तरच आम्ही ८० टक्के थकबाकी देवू ही केंद्राची**

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : BENCH AT AURANGABAD

## WRIT PETITION NO.3293 OF 2019

Shankar Bhagwanrao Deshmukh ***VERSUS*** The State Of Maharashtra And Others

Advocate for Petitioner : Deshpande Priyanka R. AGP for Respondents: S.G.Karlekar Adv.Mrs.G.L.Deshpande for R.7. **WITH WRIT PETITION NO.3304/2019** BOBADE RAGHUNATH KISHANRAO VERSUSTHE STATE OF MAHARASHTRA AND ORS. Advocate for Petitioner : Deshpande Priyanka R. AGP for Respondents: S.G.Karlekar Adv.Mrs.G.L.Deshpande for R.7. **145 WRIT PETITION NO.3291 OF 2019** VINAYAK DHONDIRAM GUTTE VERSUS THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS Advocate for Petitioner : R.R.Deshpande h/f Deshpande Priyanka R. AGP for Respondents: P.K.Lakhotia Adv. Kadam Vikram S. For R No. 7. **WITH 146 WRIT PETITION NO.3292 OF 2019** VISHWAS CHOKHAJI BHALERAO VERSUS THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS Advocate for Petitioner : Deshpande Priyanka R. AGP for Respondents: P.K.Lakhotia. Adv.Dube Anjali for R.7.

### CORAM : S.V.GANGAPURWALA & MANGESH S. PATIL, JJ.

### DATE : 18/06/2019

**PER COURT :** All these petitions involve common question of law and based on similar set of facts to avoid numerosity, are disposed of together.

**(2)** The petitioners herein are appointed in the year 1993-1995as Lecturers in various colleges. **They have retired on attaining the age of superannuation.** The contention of the learned counsel for petitioners is that these petitioners have put in pensionable service. **The pension proposal is denied to them only on the ground that the petitioners did not pass NET/SET qualification.** According to the learned counsel the benefit of Government Resolution dated 27/6/2013 would be available to the petitioners and would be entitled for the benefit of pension.

**(3)** Mr.Karlekar, Additional Government Pleader submits that the Government pursuant to the Government Resolution dated 27/6/2013 **has regularised services of those persons appointed between 23/10/1992 to 3/4/2000 though had not completed NET/SET** but did not allow them regular pensionary benefits. In Condition No.18 it has been mentioned that the incumbents are not eligible and entitled for pensionary benefits and they are eligible for DCPS.

**(4)** We have heard the learned counsel for petitioners and the learned AGP.

**(5)** The issue involved in the present matters is no longer resintegra in view of the catena of judgments delivered by this Court. **Reference can be had to the judgment at the Principal Seat in Writ Petition No.13166/2017 decided vide order dated 3/10/2018. The said judgment has been followed in various matters.**

**(6)** The details of the petitioners' appointment and the date of retirement is reproduced as under:

| Sr. No. | Writ Petition No. | Name of the Petitioner | Post | Date of Appoint-ment | Date of retire-ment |
|---|---|---|---|---|---|
| 1 | WP / 3291/ 2019 | Vinayak Dhondiram Gutte | Director of physical education | 08/08/95 | 31/08/2018 |
| 2 | WP / 3293/ 2019 | Shankar Bhagwanrao Deshmukh | Assistant Professor in economics | 06/09/93 | 31/03/2018 |
| 3 | WP / 3292/ 2019 | Vishwas Chokhaji Bhalerao | Lecturer in Sociology | 11/11/95 | 28/02/2015 |
| 4 | WP / 3304/ 2019 | Bobade Raghunath Kishanrao | Lecturer in Commerce | 20/06/98 | 30/04/2018 |

**(7)** Considering the aforesaid aspects of the matter, it is also not disputed by the respondents that the appointment of the petitioners have been made by due procedure of law and adhering to the selection process.

**(8) In light of the above, the impugned communication is quashed and set aside.** The respondents shall consider the case of the petitioners for sanction of pension as per rules after verifying the details of the appointment of the petitioners, the date of retirement and if they have put in pensionable service, shall accord sanction for pension to the petitioners.

**(9)** Writ Petitions are disposed of. No costs.

**MANGESH S. PATIL,J. S.V.GANGAPURWALA,J.**

**व्यवस्था सांगून, त्यापाठोपाठच केंद्र शासनाचे हे धोरण लक्षात घेता आम्ही 'तशाप्रकारे' न करावयाचे ठरविले आहे." हा व्याघात आपला घात करणारा आहे, हे उघड्या डोळ्यांना समोर दिसत असतांनाही आपल्याला ही थकबाकी केंव्हा ना केंव्हा मिळेलच यावर भरवसा ठेवण्याचा दुसरा भाबडेपणा महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी करावा अशी अपेक्षा करणे सुद्धा चूकच आहे.**

"**अलंकार प्रदीप**" या ग्रंथाच्या कर्त्यांनी व्याघात अलंकाराची उदाहरणे देताना "एक गृहस्थ आपली ओळख सांगतांना म्हणाला "मी जन्मभर मौनव्रत पाळतो; माझा पिता ब्रम्हचारी होता; माता वांझ होती; आणि आजा निपुत्रिक वारला." असे पहिलेच उदाहरण नमूद केले आहे. उद्याच्या ग्रंथकर्त्यांना व्याघाताची दोन सुंदर उदाहरणे पुरवून उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीने साहित्याची फार मोठी सेवा केली आहे असेच कोणीही म्हणेल!

कोणत्या प्रकारच्या शब्दार्थ योजनेला साहित्यातील अलंकार हा दर्जा प्राप्त होतो या विषयी शास्त्रकारांमध्ये वेगवेगळे विचार मांडले जात असले तरी चमत्कृतिजन्य शब्दार्थ योजना म्हणजे अलंकार ही काही शास्त्रकारांनी केलेली अलंकाराची व्याख्या लक्षात घेतली तर उपरोक्त दोनही विषयाबाबत एकाला एक लागून परस्पर विरोधी अर्थाची जी चमत्कृतिजन्य शब्दयोजना उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीने करून दाखविली आहे, ती लक्षात घेता **असंगती, विसंगती, विरोधाभास, विभावना, व्याघात, वदतोव्याघात इत्यादी शब्दार्थांच्या एकत्र कल्लोळाला एकसमयावच्छेदे करून जन्मास घालण्यासाठी या प्रसंगाचा वापर करून घेतल्याबद्दल व उपरोक्त शब्द रचनांची अद्वितीय कृती रचून त्याद्वारे मराठी सारस्वताच्या महामंदिरात अजोड कामगिरी बजावल्याबद्दल सदरहू उपसचिवाला किंवा अवर सचिवाला "सन्मानित करण्याची कोणतीही संधी" महाराष्ट्र शासनाने सोडू नये असे या कार्यकारी मंडळाला सुचवावेसे वाटते."**

३.३ नेट-सेट मुक्त शिक्षकांची सेवा सर्व प्रयोजनार्थ उद्यापासून नियमित करण्याचा शासनाचा निर्णय हा निसर्ग नियमांच्या विरुद्ध होता. "जे देणे किंवा न देणे तुमच्या हातात आहे" त्याबद्दल सार्वभौम सत्तेला उलटसुलट काहीही निर्णय घेता येईल पण घडून गेलेल्या कागदोपत्री नोंद झालेल्या घटना ज्या इतिहासाचा भाग झालेल्या आहेत, त्या कशा बदलता येतील? **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक २० मार्च २०१३ रोजी केलेल्या ठरावातील परिच्छेद ८ पुढीलप्रमाणे होता :-**

"विद्यापीठ कायद्याप्रमाणे परिनियमांनी स्थापन झालेल्या व्यवस्थेप्रमाणे मा. कुलगुरुंनी ज्याच्या नेमणुकीला मान्यता दिलेली आहे अशा प्रत्येक शिक्षकाची सेवा सर्व प्रयोजनार्थ (फक्त पदोन्नती सोडून) नेमणुकीच्या दिवसापासून यापूर्वीच धरण्यात आलेली आहे, येत आहे. **असे असतांना "या सर्व शिक्षकांची सेवा नियमित करण्यासाठी" पुढच्या सोमवारी "निघणाऱ्या शासननिर्णयाच्या दिवसापासून त्या प्रत्येक शिक्षकाची सेवा सर्व प्रयोजनार्थ धरली जाईल." असे एक मोठे कपटकारस्थान उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीने शिजविले असून त्याचे परिणाम समजून घेणे गरजेचे आहे.** विद्यापीठ कायदा व परिनियमांनी दिलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्रातल्या सर्व कुलगुरुंनी यापुढे निवडीला व नेमणुकीला मान्यता देतांना नोकरशहांची 'आरती' काढलीच पाहिजे असे या कटकारस्थानाचे स्वरुप आहे. महाराष्ट्रातील सर्व कुलगुरुंनी प्रदान केलेली मान्यता निर्माल्यवत ठरवून एकाच फटकाऱ्यात त्या सर्व कुलगुरुंना कमालीचे अवमानित करण्यात आले आहे. विधिनियमांनी व परिनियमांनी स्थापीत झालेल्या सर्वच विद्यापीठाच्या विधिमय यंत्रणांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या विधिवत निर्णयांना उच्च शिक्षण विभागातील काही नोकरशहांनी थप्पड लगावण्याचा हा प्रकार निंद्य असून असा प्रकार महाराष्ट्रात यापूर्वी कधीही घडलेला नव्हता. थकबाकी अदा करण्याच्या पूर्वीच्या सर्व रिती मोडून काढून आज ही नवी पद्धती आणण्यामागचे नोकरशाहीचे हेतु काय आहेत? याचीही माहिती करुन घेण्याचा मा. कुलगुरुंना अधिकार आहे."

४. पुढे याबाबतचा शासननिर्णय दिनांक २७ जून २०१३ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केला. त्या शासननिर्णयातील परिच्छेद १५ व १८ शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"१५. दिनांक २३.१०.१९९२ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील ज्या बिगर नेट/सेट अध्यापकांना **(नी)** त्यांच्या सेवाकालावधीत विद्यापीठ अनुदान आयोगाने अधिव्याख्याता पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता (नेट/सेट/पीएच.डी/एम.फील) प्राप्त केली नाही. अशा अध्यापकांना खालील अटींच्या अधीन राहून **त्यांच्या सेवा सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास शासन मान्यता देत आहे.**

(अ) संबधित अध्यापकाची नियुक्ती नियमित स्वरुपात (Regular Basis) असावी.

(ब) संबंधित अध्यापकांची नियुक्ती विहीत केलेल्या सर्व कार्यपद्धतीचे अनुपालन करून केलेली असावी.

(क) संबंधित अध्यापकांच्या नियुक्तीस नेट/सेट अर्हतेची अट वगळता इतर सर्व विहीत अर्हता व अटींची पूर्तता करून विद्यापीठाकडून मान्यता देण्यात आलेली असावी.

(ड) संबंधित अध्यापकांचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेसाठी विद्यापीठाकडून सादर करण्यात आलेला असावा."

"१८. सदर अध्यापकांच्या सेवा शासन निर्णय निर्गमित झाल्याचा **(झाल्याच्या)** दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचा निर्णय घेण्यात आला असल्यामुळे **या अध्यापकांना शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.**" *(P108NB2013)*

४.१ दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयावर 'नुटा'च्या कार्यकारी मंडळाने सोमवार, दिनांक २२ जुलै २०१३ रोजी विषय क्रमांक ४१ वर एक ठराव करून आपली तपशीलवार प्रतिक्रिया उच्च शिक्षण विभागाला कळविली. आजचा लेख मुख्यत्वे नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनीच पेन्शन योजना लागू असण्याशी संबंधित असल्याने त्याबाबतचा त्या ठरावातील परिच्छेद २६ व २७ शब्दशः नमूद करीत आहोत. तो पुढीलप्रमाणे:-

"२६. यातील प्रत्येक शिक्षकाची सेवा किमान १२ ते २२ वर्षे इतकी झालेली आहे. त्यातील प्रत्येक जण हा स्थायी आस्थापनेवर कार्यरत होता व आहे. मा. राज्यपालांच्या मान्यतेनंतर अस्तित्वात आलेल्या परिनियमानुसार तो आपल्या स्थायी पदावरील सेवेत २ वर्षानंतर कन्फर्म झालेला आहे. मिळाली ती सेवा स्वीकारणारा थोडा फार टक्का प्रत्येकच सेवेत असतो पण वेगवेगळ्या सेवेमध्ये शिरण्याची संधी उपलब्ध असतांना त्या त्या सेवादारांना भरतीच्या वेळी त्या त्या सेवांमध्ये उपलब्ध असलेल्या सेवाशर्तींची तुलनात्मक स्थिती पाहून अमुक एका सेवेत प्रवेश करावयाचा, हे ठरविण्याऱ्या उमेदवारांची टक्केवारी सुद्धा बरीच मोठी असते. खरे म्हणजे ही पदे भरतांना जी जाहिरात दिली तिच्या सोबतच दुसरी एक जाहिरात देण्याचा हूकूम सर्व विद्यापीठाना त्यावेळीच उच्च शिक्षण विभागाला देता आला असता. "तुम्ही १९९१ ते ९९ या काळात विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक म्हणून सेवेत प्रवेश करीत आहात. आजच्या कायद्याप्रमाणे तुम्ही २ वर्षानंतर कन्फर्मही व्हाल. तुम्हाला पेन्शन योजनासुद्धा आज लागू आहे. पण पुढे २०१३ मध्ये ही भ्रष्ट नोकरशाही तुम्हाला जुन्या पेन्शन योजनेतून काढून नव्या पेन्शन योजनेत ढकलू शकेल" अशा स्वरूपाची जाहिरात त्यावेळी दिली असती तर त्या नोकरशाहीची व त्यांच्या 'हो' त 'हो' मिसळविणाऱ्या राज्यकर्त्यांची केव्हढी सोय झाली असती?" *(P63EX13)*

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY, NAGPUR BENCH : NAGPUR.**
WRIT PETITION NO. 701 OF 2020

Nagpur University Teachers Association, Amravati ***VERSUS*** The Union of India and others

Shri Firdos Mirza, Advocate for petitioner. Shri U. M. Aurangabadkar, A.S.G.I. for respondent no. 1. Ms. N. P. Mehta, A.G.P. for respondent nos. 3 and 4.

**CORAM**
**R.K. DESHPANDE AND AMIT B.BORKAR, JJ.**
**DATED :- 04.02.2020**

The Government Resolution dated 08.03.2019 and Corrigendum dated 10.05.2019 issued by the Higher & Technical Education Department (H&TED) are contrary to resolution dated 05.03.2019 passed by the Cabinet. The inconsistency with the decision of the Cabinet and Government Resolution is pointed out in para no. 10 of the petition.

**2.** Issue notice for final disposal of the matter to the respondents, returnable on 31.03.2020.

**3.** Shri U. M. Aurangabadkar, learned A.S.G.I. waives service of notice for respondent no. 1 and Ms. N. P. Mehta, learned A.G.P. waives service of notice for respondent nos. 3 and 4.

**4.** We direct respondent no. 3-H&TED of the State Government to examine this aspect and find out if there exist any inconsistency between the decision of the Cabinet and the actual Government Resolution issued to implement the scheme. The argument before us is that the Central Government, Ministry of Human Resource Development has issued instructions to the University Grants Commission (UGC) on 02.11.2017 and suggested that payment of Central assistance for implementing the scheme shall be without any modification and to be implemented along with pay-scales mentioned therein. Accordingly, the UGC on 18.07.2018 provided the Regulation and this is accepted by the Cabinet but, the Government Resolution is inconsistent with the requirements.

JUDGE JUDGE

४.२ 'नुटा'च्या कार्यकारी मंडळाने २२ जुलै २०१३ रोजी संमत केलेल्या या ठरावातील परिच्छेद २७ पुढीलप्रमाणे :-

"२७. नजरेआड करता येणार नाही असा आणखी एक कायदेशीर मुद्दा या संदर्भात लहान मुलांच्यासुद्धा लक्षात येण्यासारखा आहे. नवीन पेन्शन योजना सन २००५ च्या एका शासननिर्णयाने (Government Resolution No.CPS-1005/ 126/SER-4 Mantralaya, Mumbai-400032. : Dated 31st October, 2005.) महाराष्ट्रात लागू झाली त्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ४ (a) मध्ये स्पष्टपणे पुढील प्रमाणे उल्लेख आहे. :- "4. (a) As mentioned above, new defined contribution pension scheme will be applicable to Government servants who are recruited on or after 1st November 2005 in State Government service to whom the existing pension scheme and General Provident Fund Scheme is applicable." याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत भरती (Recruited) झालेल्या कर्मचाऱ्यांना ही नवी योजना लागू राहील. प्रत्यक्ष भरती सन २००० च्या अगोदर झाली असली तरी निदान **"या प्रत्येक शिक्षकांची भरती ही सन २००५ नंतर झालेली आहे असे समजले जाईल"** असे वाक्य तरी निदान परिच्छेद १८ मध्ये, खोटे का होईना, पण टाकायला पाहिजे होते. त्या परिच्छेदात "भरती" हा शब्द कोठेही वापरलेला नाही आणि भरती सन २००५ पूर्वीची असेल तर त्याला नवी पेन्शन योजना लागू होत नाही. मा. उच्च न्यायालयाच्या निकालामुळे १२ ते २२ वेतनवाढी ज्यांना मिळतात किंवा मिळत आहेत त्यांची भरती सन २००५ नंतर झालेली आहे असे कसे म्हणणार? हाही विचार त्या बिचाऱ्यांसमोर आला नसेल असे म्हणता येत नाही. शासननिर्णयाच्या सर्व परिच्छेदात ते सन २००० पूर्वी भरती झालेले आहेत हे मान्य करायचे मात्र या कामासाठी ते सन २००५ नंतर भरती (तसा शब्द नसला तरी) झालेले आहेत असे मानुन चालण्याचा प्रकार "सत्तेपुढे कायदा वगैरे काही टिकत नाही" हे सिद्ध करणारा असला तरी न्यायालयापुढे ते शहाणपण टिकणार नाही व फक्त कायदाच टिकेल असा या संघटनेचा दृढ विश्वास आहे." *(P64EX13)*

५. सत्तेपुढे शहाणपण टिकत नाही, सत्तेपुढे कायदा टिकत नाही, सत्तेपुढे निसर्ग नियम सुद्धा टिकत नाही याचा उत्तम अनुभव २७ जून २०१३ च्या 'शुभ' शासननिर्णयाने व त्या शासननिर्णयातील "१९९३ साली जरी विधिवतरित्या त्याची नेमणूक झालेली असली तरी ती २०१३ नंतर झालेली आहे असे समजले जाईल व त्याला नवी पेन्शन योजना लागू राहील" या शुभ वचनातून आला. "न्यायालयापुढे हे शहाणपण टिकणार नाही. फक्त कायदाच टिकेल असा या संघटनेचा दृढ विश्वास आहे" हे संघटनेचे म्हणणे किती रास्त होते, हे पुढे न्यायालयीन संघर्षात स्पष्टपणे दिसून आले.

५.१ 'कॅस' अंतर्गत लाभ देणे या विषयावर निरनिराळ्या याचिका एकत्र करून किंवा स्वतंत्रपणे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या १६ खंडपीठांनी या शिक्षकांच्या बाजूने निर्णय दिलेले आहे. *(P107NB14)* मा.सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा या शिक्षकांना 'कॅस'चे फायदे देणारा अंतरिम आदेश दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी पारित केला. तो पुढील शब्दात :-

"4. We are of the view that following the UGC Notification/ Letter dated 4.11.2008, those teachers who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of career advancement scheme only for the purpose of pay-scales. According to us such an interim order for that limited purpose will meet ends of justice." *(P143NB2013)*

५.२ मा.सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाप्रमाणे अनेकांना लाभ मिळाले. हा आदेश आजही कायम आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने मागे घेतलेला नाही. हे खरे आहे की, मुंबई खंडपीठाचा २३ डिसेंबर २०१५ रोजीचा एक निर्णय कॅस बेनिफिटच्या विरोधात गेलेला आहे. पण त्या खंडपीठाने आपल्याच निर्णयाच्या परिच्छेद ८८ मध्ये आपल्याच निर्णयाची अंमलबजावणी रोखून ठेवलेली आहे. ती पुढील शब्दात :-

"However, in view of the fact that the matters are pending in Supreme Court and as we have decided these matters based upon the orders passed by the Supreme Court, pending the Appeals and the Special Leave Petitions, we are inclined to observe that **this judgment shall not be given effect, so far as the order of vacating interim orders are concerned, till the Supreme Court passes an appropriate order.** The Respondents/parties, if required, to take any steps based upon this judgment, shall be after further order of the Supreme Court."

५.३ सर्व कागदपत्रांच्या काळजीपूर्वक केलेल्या अभ्यासाच्या आधारावर ठामपणे असे नमूद करता येईल की, मा. सर्वोच्च न्यायालयाने CAS चे फायदे या शिक्षकांना देणारा जो अंतरिम आदेश दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी पारित केला तो आजही कायम आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने तो दुरूस्त केलेला नाही, मागे घेतलेला नाही किंवा रद्द केलेला नाही.

६. हा लेख मुख्यत्वे या नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल यासंदर्भात असल्यामुळे इतर आणखी तपशील देण्याचे टाळून जुन्या पेन्शन योजनेबाबतच्या न्यायालयीन संघर्षाचे तपशील पाहू.

## मा. उच्च न्यायालयाचा पहिला निर्णय

६.१ याबाबतीत पहिला निर्णय हा दिनांक **३ ऑक्टोबर २०१८** रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये दिलेला आहे. *(P120NB2018)*

६.१.२ मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये याचिकाकर्त्यांबाबतचे तपशील पुढील शब्दात नमूद आहेत :-

"We find that the contention raised on behalf of the Respondents are wholly untenable. Undisputedly, the **Petitioner when he was appointed in 1999 was possessing the requisite qualification except the net-set examination.** Not only this

---

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHER'S ORGANISATION**
University Club House, B-Road, Churchgate, Mumbai 400 020
PRESIDENT
**PROF. DR. TAPATI MUKHOPADHYAY**
GENERAL SECRETARY
**PROF. DR. S.P. LAWANDE**

## 13 January 2020

To,
Shri Uddhav Thackeray,
Honorable Chief Minister,
Maharashtra State,
Mantralaya, Mumbai 400 032

Sub : Request for an appointment to a MFUCTO delegation for Discussion on Long Pending Issues of College and University Teachers in Maharashtra.

Honorable Sir,

We on behalf of MFUCTO congratulate the newly formed State Government, under your leadership as the Chief Minister of Maharashtra. There are expectation and hope that the pending problems in the State would be resolved.

The MFUCTO is the representative organisation for the teachers in 11 Universities and their affiliated colleges in Maharashtra. The organisation is fighting for the cause of teacher's benefits for last several decades. MFUCTO is affiliated to All India Federation of University and College Teachers' Organisations (AIFUCTO)

The Higher Education in Maharashtra is in deep crisis that is continuing from more than a decade. The MFUCTO, as a state-level organisation has time and again represented these issues before the Government in the form of memorandums, held demonstrations in Mumbai, Pune, Nagpur and carried out State Level agitations. However, most of the issues raised in the memorandums have remained unresolved, creating dissatisfaction among teachers and students.

In the light of above situation, we wish to reopen discussion with you so that the long pending demands of MFUCTO can be resolved. We earnestly request to you to give an appointment to a delegation of MFUCTO to discuss the long pending demands of teachers, paving the way for their amicable solution. Kindly oblige.

With Regards.

Yours Sincerely,

Dr. Tapati Mukhopadhyay (President)
Dr. S.P Lawande (General Secretary)

**Enclosures : (i) Annexure 1** - MFUCTO Resolution dated 5 January 2020 (ii) Annexure A - List of Issues (iii) Annexure B - Revised Minutes of Meeting held on 25 September 2018 (iv) Exhibits E1-E6 - Representations submitted to various authorities.

***Note :-*** *Similar letter on the same date was addressed to Honorable Minister for Higher Education.*

but the Petitioner's appointment was already approved by the Competent Authority and as such requisite scale was made applicable to the Petitioner till his retirement." *(P120NB2018)*

**६.१.३** मा. खंडपीठाने आपल्या या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये शासनाचा २७ जून २०१३ चा संपूर्ण शासननिर्णय शब्दशः उधृत केलेला आहे व त्याबाबतचे खंडपीठाचे मत परिच्छेद ८ मध्ये नमूद केलेले आहे. :-

**"It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination,** M.Phil. and Ph.D.qualification. Only requirement is that the appointment of these lecturers is required to be made after following due selection process. The other requirement is that appointment of such lecturers ought to have been approved by the University and University should have submitted the proposal for grant of approval of such teachers to the University Grant Commission."

**६.१.४** या शिक्षकाची सेवा त्याच्या नेमणुकीच्या दिनांकापासून धरण्यात यावी असे मा.उच्च न्यायालयाच्या या आदेशाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"Undisputedly, the Petitioners' appointment was made after following due selection process. Not only University as well as the Respondent -Joint Director of Education had also granted approval to the appointment of the Petitioner. **As such, it can be clearly seen that the Petitioner is entitled to the benefits of the said G.R. Undisputedly, the Petitioner's date of appointment is 20/9/1999 i.e. the date which falls between 23/10/1992 to 03/04/2000."**

**६.१.५** आम्ही शासननिर्णय २७ जून २०१३ रोजी काढला हा शिक्षक त्यापूर्वी सेवानिवृत्त झाला. मात्र तरी त्याला हा शासननिर्णय लागू पडतो हे शासनाचे म्हणणे मा.उच्च न्यायालयाने अग्राह्य ठरविले ते पुढील शब्दात :-

**"10.** The reason which is given that since G.R. is issued on 27/06/2013 and the Petitioner has retired prior to the coming into force of the said G.R. is also absolutely untenable. G.R. provides for grant of protection to the employees who are appointed between the aforesaid two dates. Merely because the Petitioner has superannuated prior to the date of the said Government Resolution cannot be a ground to deny the pension to the Petitioner to which the Petitioner is otherwise entitled in accordance with the said G.R. We are therefore of the considered view that the impugned order dated 17/04/2017 is not sustainable." *(P121NB2018)*

**६.१.६** शेवटी मा. खंडपीठाने या प्रकरणी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले :-

**"ORDER**

(i) The impugned order dated 17/04/2017 is quashed and set aside.

(ii) The Respondents are directed to make the pension applicable to the Petitioner on the basis of his last drawn salary.

(iii) The pension is to be paid to the Petitioner from the month of November 2018. All the arrears between the date of superannuation till 31/10/2018 shall be cleared within a period of 3 months from today." *(P121NB2018)*

**६.१.७** **"उपरोक्त चार अटी पूर्ण करणाऱ्या नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या सेवा नियमित करण्यात येत आहेत"** या शासननिर्णयातील वाक्याचा अर्थ उच्च न्यायालयाच्या या निर्णयाने निश्चित केलेला आहे. त्याला जुनी पेन्शन योजनाच लागू होईल व त्या प्रयोजनार्थ त्याची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासूनच धरावी लागेल. या खंडपीठाने पहिल्या निर्णयामध्ये लावलेला अर्थ पुढच्या सर्वच खंडपीठांनी दिलेल्या निर्णयांमध्ये तसाच्या तसा मान्य केलेला असून मा. सर्वोच्च न्यायालयाचे त्यावर शिक्कामोर्तब झालेले आहे.

## मा. उच्च न्यायालयाचा दुसरा निर्णय

**६.२** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा दुसरा निर्णय सन २०१७ च्या याचिका क्रमांक १२१९ मध्ये दिनांक १९ ऑक्टोबर २०१८ रोजी मा.मुंबई खंडपीठाने दिला. पहिला निर्णय (पहिला निर्णय याचा अर्थ सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये मा. मुंबई खंडपीठाने दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी दिलेला निर्णय. या लेखात यापुढे पहिला निर्णय असा उल्लेख) देतांना जे ज्येष्ठ न्यायमूर्ती खंडपीठात होते तेच या खंडपीठात सुद्धा ज्येष्ठ न्यायमूर्ती म्हणून होते.

**६.२.१** पहिल्या निर्णयाचा स्पष्ट उल्लेख या दुसऱ्या निर्णयामध्ये करण्यात आला असून त्या सारखेच हे प्रकरण असल्याचे खंडपीठाने या निर्णयाच्या परिच्छेद तीन मध्ये नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"(3) The facts in the present case are almost identical with the facts in Writ Petition No.13166 of 2017, which has been allowed by Division Bench of this Court vide judgment dated 3rd October 2018. We therefore find it appropriate to allow this Petition in the light of the judgment of the Division Bench dated 3rd October 2018 passed in Writ Petition No.13166 of 2017." *(P137NB2018)*

**६.२.२** या निर्णयामध्ये जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आदेश तर मा.उच्च न्यायालयाने दिलेच, मात्र त्याचबरोबर जुनी पेन्शन योजना लागू करतांना ५.१०.१९९२ या नेमणुकीच्या तारेखपासून त्या शिक्षकाची सेवा धरावी लागेल असे स्पष्ट आदेश या प्रकरणात पारित केले ते पुढीलप्रमाणे :-

## नजिकच्या काळात सेवानिवृत्त होत असलेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांची सभा

## सभेची सूचना

सन १९९२ ते २००० या कालखंडात विधिवतरित्या सेवेत दाखल झालेल्या व नजिकच्या काळात सेवानिवृत्त होत असलेल्या अधिव्याख्यात्यांची सभा बोलाविण्यात येत आहे. या सभेमध्ये नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू असेल याबाबत (१) मा. उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या सात खंडपीठांनी दिलेले निर्णय (२) सर्वोच्च न्यायालयामध्ये निरनिराळ्या तीन प्रकरणी शासनाच्या विशेष अनुमती याचिका फेटाळल्या जाणे (३) राज्यशासनाच्या उच्च शिक्षण विभागाने स्वीकारलेले आकसाचे धोरण (४) याबाबत करावयाच्या उपाययोजना

उपरोक्त चार मुद्यांवर चर्चा व विचारविनिमय करण्यासाठी नजिकच्या काळात सेवानिवृत्त होत असलेल्या नेट-सेट मुक्त विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. बैठकीचा दिवस, दिनांक वेळ व स्थळ खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे. सर्व संबंधित प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**- डॉ. विलास ढोणे, सचिव, नुटा**

| तक्ता |
|---|
| **सभेचे ठिकाण :** शिक्षक भवन, अमरावती विद्यापीठ परिसर, अमरावती |
| **सभेचा दिवस व दिनांक :** रविवार, दिनांक ५ एप्रिल २०२० |
| **सभेची वेळ :** दुपारी ४.०० वाजता |

**"ORDER : (i)** The Respondents are directed to make the pension applicable to the Petitioner on the basis of her last drawn salary. **(ii)** The pension is to be paid to the Petitioner from the month of November 2018. All the arrears between the date of superannuation till 31/10/2018 shall be cleared within a period of 3 months from today. **(iii)** Needless to state that while making pensionary scheme applicable, the date of the appointment of the Petitioner shall be construed as 05/10/1992. **(iv)** The Writ Petition is disposed of in the aforesaid terms." (*P137NB2018*)

## मा. उच्च न्यायालयाचा तिसरा निर्णय

६.३ नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा तिसरा निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १२ डिसेंबर २०१८ रोजी सन २०१६ च्या याचिका क्रमांक १३०४ मध्ये दिला, असे दिसून येते. (*P25NB2019*)

६.३.१ या निर्णयामध्ये मा.खंडपीठाने दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाचा अर्थ मा.मुंबई खंडपीठाने पहिल्या निर्णयान्वये निश्चित करून दिलेला आहे असे स्पष्ट शब्दात नमूद केले ते पुढीलप्रमाणे :-

**"Government Resolution dated 27th June, 2013 has been interpreted by this Court at its Principal Seat in Writ Petition No. 13166 of 2017 under order dated 03rd October, 2018."**

६.३.२ पहिल्या निर्णयात मा.मुंबई खंडपीठाने काय निश्चित केलेले आहे? हेही या निर्णयात मा.खंडपीठाने नमूद केले आहे ते पुढील शब्दात :-

**"It has been held by this Court that as per the said Government Resolution, the State Government has exempted the lecturers appointed between 23rd October, 1992 to 03rd April, 2000 from possessing the NET/SET qualification.** Appointment of the husband of the petitioner appears to have been approved even exemption has been granted by the University Grants Commission."

६.३.३ दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाने या शिक्षकांच्या सेवा नियमित केलेल्या असल्यामुळे या शासननिर्णयाप्रमाणे कुटुंब निवृत्ती वेतन लाभार्थ्यांना सुद्धा जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असेही या निर्णयात नमूद केले आहे ते पुढील शब्दात :-

"**The said Government Resolution would apply to the husband of the petitioner. The date of death and/or retirement would not make any difference.**" (*P25NB2019*)

## मा. उच्च न्यायालयाचा चौथा निर्णय

६.४ नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा चौथा निर्णय विजयकुमार रणपिसे विरुद्ध महाराष्ट्र शासन या सन २०१९ च्या याचिका क्रमांक ७५५ मध्ये दिनांक ९ एप्रिल २०१९ रोजी मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिला. (*P103NB2019*)

६.४.१ हा वादग्रस्त विषय राहिलेला नाही. मुंबई खंडपीठाने ३ ऑक्टोबर २०१८ रोजी सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये हा वाद निकाली काढलेला आहे व ज्या खंडपीठाने हा प्रश्न निकाली काढला त्या खंडपीठात जे ज्येष्ठ न्यायमूर्ती होते तेच ज्येष्ठ न्यायमूर्ती आज या खंडपीठात आहेत असा स्पष्ट उल्लेख या निर्णयाच्या परिच्छेद ८ मध्ये आहे तो पुढील शब्दात :-

"The issue is no more res integra. The Division Bench of this Court of which one of us (Gavai, J) was a party, through judgment and order dated 3rd October 2018 in Writ Petition No.13166/2017 (Maruti Dattatraya Patil Vs. The State of Maharashtra and ors.), has observed thus :

*"8. It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination, M.Phil. and Ph.D. qualification. Only requirement is that the appointment of these lecturers is required to be made after following due selection process. The other requirement is that appointment of such lecturers ought to have been approved by the University and University should have submitted the proposal for grant of approval of such teachers to the University Grant Commission."* (*P103NB2019*)

६.४.२ नेमणुकीच्या दिनांकापासूनच या शिक्षकांची सेवा धरावी लागेल असेही स्पष्टपणे या निर्णयाच्या परिच्छेद ११ मध्ये आदेशित करण्यात आलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"Needless to state that while making pensionary scheme applicable, the date of the appointment of the Petitioner shall be construed as 14th August 1995." (*P103NB2019*)

६.४.३ या प्रकरणामध्ये मा.खंडपीठाने पारित केलेले आदेश हे पुढीलप्रमाणे आहेत :-

**"ORDER : (i)** The Writ Petition stands allowed. **(ii)** The impugned order dated 14th January 2018 is quashed and set aside. **(iii) The Respondents are directed to make the pension applicable to the petitioner on the basis of his last drawn salary. (iv)** The pension is to be paid to the Petitioner from the

# UGC REGULATIONS ARE MANDATORY IN NATURE.

**UNIVERSITY GRANTS COMMISSION : SECRETARY : PROF. RAJNISH JAIN,**

**(Ministry of Human Resource Development, Govt. of India) : Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002**

Ph.011-23236288/23239337 Fax : 0l l-2323 8858 E-mail : sacy.ugc@nic.in

**No.F.17-7/2013(PS/Misc)Pt.F1 : 27th FEBRUARY, 2020**

To,

The Vice-Chancellor, All the Universities.

**Sub :** Promotion and counting of past services under Career Advancement Scheme as per UGC (Minimum Qualifications for Appointment of Teachers & Other Academic Staff in Universities and Colleges and Measures for the Maintenance of Standards in Higher Education, 2018) Regulations, 2018.

Dear Sir/Madam,

As you are aware, **UGC** (Minimum Qualifications for Appointment of Teachers & Other Academic Staff in Universities and Colleges and Measures for the Maintenance of Standards in Higher Education, 2018) **Regulations, 2018** has provisions for the recruitment & promotion of faculty members under Career Advancement Scheme (CAS) **and the same are mandatory in nature.** These UGC Regulations also provide for counting of past service.

Nevertheless, it has come to the notice of UGC that many eligible candidates face difficulties in getting promotion and in counting of past services. Delay in promotion to those who have demonstrated satisfactory performance in service is not a practice consistent with aforementioned regulations.

You are, therefore, requested to take appropriate action to decide all pending promotion cases at the earliest.

Yours sincerely, (Rajnish Jain)

month of May 2018. All the arrears between the date of superannuation till 30th April 2019 shall be paid within a period of three months from today." *(P103NB2019)*

## मा. उच्च न्यायालयाचा पाचवा निर्णय

**६.५** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा पाचवा निर्णय सन २०१९ च्या याचिका क्रमांक ३२९३ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १८ जून २०१९ रोजी दिल्याचे आढळून येते. *(P16NB2020)*

**६.५.१** हा निर्णय देतांना पहिल्या प्रकरणाचा स्पष्ट उल्लेख या खंडपीठाने आपल्या निर्णयात केला असून आपल्या समोर असलेले प्रकरण त्यासारखेच असल्यामुळे याबाबत त्यासारखाच निर्णय देत असल्याचे नमूद केले आहे. ते पुढील शब्दात :-

"**(5)** The issue involved in the present matters is no longer resintegra in view of the catena of judgments delivered by this Court. **Reference can be had to the judgment at the Principal Seat in Writ Petition No.13166/2017 decided vide order dated 3/10/2018. The said judgment has been followed in various matters."** *(P16NB2020)*

**६.५.२** संबंधित शिक्षकाला जुनी पेन्शन योजना लागू होणार नाही व त्याला नवीन पेन्शन योजना लागू करण्यात येईल असे नमूद करणारे सहसंचालकांचे परिपत्रक मा. खंडपीठाने रद्दबादल ठरविले व त्यांच्या नेमणुकीच्या दिनांकापासून ते सेवानिवृत्ती दिनांकापर्यंत त्यांची सेवा धरून त्यांचे पेन्शन निश्चित करावे असे आदेश पारित केले ते पुढील शब्दात :-

**"(8) In light of the above, the impugned communication is quashed and set aside.** The respondents shall consider the case of the petitioners for sanction of pension as per rules after verifying the details of the appointment of the petitioners, the date of retirement and if they have put in pensionable service, shall accord sanction for pension to the petitioners." *(P16NB2020)*

## मा. उच्च न्यायालयाचा सहावा निर्णय

**६.६** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा सहावा निर्णय सन २०१९ च्या याचिका क्रमांक २०६८ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक २९ जुलै २०१९ रोजी राजेश वसंतराव पांडे विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणात दिल्याचे आढळून येते. *(P134NB2019)*

**६.६.१** हा निर्णय देतांना पहिल्या प्रकरणाचा स्पष्ट उल्लेख या खंडपीठाने आपल्या निर्णयात केला असून आपल्या समोर असलेले प्रकरण त्यासारखेच असल्यामुळे याबाबत त्यासारखाच निर्णय देत असल्याचे नमूद केले आहे. पहिला निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयात कायम करण्यात आल्याचेही या निकालात नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"It is not in dispute that the facts involved in this petition are identical to those involved in Writ Petition No. 13166 of 2017 which has been decided on 3.10.2018 by the Division Bench of this Court at main seat. **The said judgment has been confirmed by the Hon'ble Apex Court in SLP (C) No. 14703/ 2019 on 1.7.2019** when it dismissed the same. We, therefore, see no difficulty in allowing the present writ petition on the same line as has been done in WP No. 13166 of 2017." *(P134NB2019)*

**६.६.२** संबंधित शिक्षकाला जुनी पेन्शन योजना लागू होणार नाही व त्याला नवीन पेन्शन योजना लागू करण्यात येईल असे नमूद करणारे सहसंचालकांचे परिपत्रक मा. खंडपीठाने रद्दबादल ठरविले व त्यांच्या नेमणुकीच्या दिनांकापासून (०१.०२.१९९३) ते सेवानिवृत्ती दिनांकापर्यंत (३१.०५.२०१९) त्यांची सेवा धरून त्यांचे पेन्शन निश्चित करावे असे आदेश पारित केले ते पुढील शब्दात :-

"We quash and set aside the communication impugned herein. We direct respondents no. 1 and 2 to pay pension and pensionary benefits to the petitioner for the services rendered by him from 1.2.1993 to 31.5.2019 with respondent no. 3 College as per the prevailing rules and all arrears of the pensionary and retiral benefits with effect from the date of superannuation be paid to the petitioner within three months from the date of this order." *(P134NB2019)*

## मा. उच्च न्यायालयाचा सातवा निर्णय

**६.७** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा मा. उच्च न्यायालयाच्या स्तरावरील सातवा निर्णय हा सन २०१५ च्या याचिका क्रमांक ११३१६ मध्ये मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २८ ऑगस्ट २०१९ रोजी दिला असे दिसून येते.

**६.७.१** हा निर्णय खुपच तपशीलवारपणे देण्यात आलेला असून दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी दिलेल्या पहिल्या निर्णयाचा तपशीलवार उल्लेख या निर्णयामध्ये करण्यात आलेला असून २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाचा अर्थ काय होतो? याबाबत पहिल्या निर्णयाने घेतलेली भूमिका या खंडपीठाने उचलून धरलेली आहे. ती पुढील शब्दात :-

**"In view of these facts, it may be necessary for us to refer to the observations in the judgment and order dated 3rd October, 2018 and the same read thus:**

*"6. We find that the contention raised on behalf of the Respondents are wholly untenable. Undisputedly, the Petitioner when he was appointed in 1999 was possessing the requisite qualification except the net-set examination. Not only this but the Petitioner's appointment was already approved by the Competent Authority and as such requisite scale was made applicable to the Petitioner till his retirement.*

*7. Taking into consideration the difficulties of various lecturers being appointed but were not possessing the net-set examination, the Government has come out with the resolution dated 27/06/2013. …………..*

*8. It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination, M. Phil and Ph.D. qualification.*

**६.७.२** याचिकाकर्त्यांना नवी पेन्शन योजना लागू करणारे परिपत्रक मा.खंडपीठाने रद्दबादल ठरविले व थकबाकीसह जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आदेशित केले ते पुढील शब्दात :-

*"ORDER : **(i)** The impugned order dated 17/04/2017 is quashed and set aside. **(ii)** The Respondents are directed to make the pension applicable to the Petitioner on the basis of his last drawn salary. **(iii)** The pension is to be paid to the Petitioner from the month of November 2018. All the arrears between the date of superannuation till 31/10/2018 shall be cleared within a period of 3 months from today." (P3NB2020)*

**६.७.३** याच प्रकारातील शेकडो शिक्षकांना जुनी पेन्शन योजना यापूर्वी लागू करण्यात आलेली आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास अमरावती, नागपूर व गोंडवाना विद्यापीठ क्षेत्रात यापूर्वी जुनी पेन्शन योजना लागू झाली नाही असे एकही नेट-सेट मुक्त शिक्षकाचे प्रकरण नव्हते. राजेश पांडे यांचे प्रकरण हे या विभागातील पहिले प्रकरण होय. एक एका शिक्षकाला वेगळे काढून कायद्याच्या विरोधात वागणूक देऊन दिवाळसण साजरे करणे यापेक्षा वेगळा हेतू त्यामागे असू शकत नाही, ही गोष्ट उघड आहे.

**(i)** महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने याबाबतीत यापूर्वी अतिशय उत्तम लौकिक मिळविला आहे. हे शासन दरबारी नोंदबद्ध झालेले आहे. आम्हाला वाटले, आमच्या मनात आले तर आम्ही कोणत्याही वर्गाच्या कोणत्याही वेतनश्रेण्या वाढवून देऊ. आमची पुजाअर्चा झाली नाही तर उच्च न्यायालयाच्या सात खंडपीठांचा निर्णय झालेला असला तरी आणि सर्वोच्च न्यायालयात त्यावर शिक्कामोर्तब झाले असले तरी आम्ही नवीन पेन्शन योजनाच लागू करू हे जे उद्धटपणाचे वर्तन उच्च शिक्षण विभागातील अधिकारी करीत आहेत ते नोंद घेण्यासारखे आहे.

**(ii)** मंत्रिमंडळाची मान्यता नसतांना आणि वित्त विभागाची सुद्धा मान्यता नसतांना या विभागातील अधिकाऱ्यांनी अनेक वर्गांचे वेतन वारेमाप वाढवून दिले या विषयी बक्षी समितीच्या अहवालातील परिच्छेद ४.६.३ मध्ये या बाबीची नोंद झाल्याचे आपल्याला दिसून येते. ती पुढील शब्दात :-

"योग्य त्या कार्यपद्धतीचा अवलंब न करता निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील ज्या पदनामांमध्ये व वेतनश्रेण्यांमध्ये नियमबाह्य बदल केल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे, अशी सर्व पदनामे व त्या पदांना मंजूर केलेल्या वेतनश्रेण्या ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित करण्यापूर्वीच दिनांक

७.१०.२००९ च्या शासन अधिसूचनेनुसार कटाक्षाने पूर्ववत करण्याची कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तातडीने करावी, तसेच **अशा अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या त्वरीत शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस समिती करीत आहे.**"

महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाने याबाबतीत घेतलेला निर्णय संबंधित शासननिर्णयात नमूद आहे. तो पुढील शब्दात :-

"**अशा अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर त्वरीत शिस्तभंगाची कारवाई करावी.**"

(सहपत्र एक : परिच्छेद १२.२ पहा.)

**PROFORMA FOR FIRST LISTING**

Section : IX

| | |
|---|---|
| The case pertains to (Please tick/ check the Correct box) : | |
| Central Act : | N/A |
| Section : | N/A |
| Central Rule : | N/A |
| Rule No(s) : | N/A |
| State Act : | N/A |
| Section : | N/A |
| State Rule : | N/A |
| Rule No(s) : | N/A |
| Impugned Interim Order : | N/A |
| Impugned Final Order/Decree : | 09.04.2019 |
| High Court : | High Court of Judicature at Bombay |
| Names of Judges : | B.R.GAVAI & DAMA SESHADRI NAIDU, JJ |
| Tribunal/Authority : | N/A |
| 1. Nature of matter : | Civil |
| 2. (a) Petitioner/ appellant No. : | The State of Maharashtra & Ors. |
| (b) e-mail ID : | govtadvdelhi@gmail.com |
| (c) Mobile Phone number | N/A |
| 3. (a) Respondent : | Ranpise Vijaykumar Baburao & Ors. |
| (b) e-mail ID : | N/A |
| (c) Mobile Phone number | N/A |
| 4. (a) Main category classification : | 18 |
| (b) Sub classification : | 1807 (Ors) |
| 5. Not to be listed before : | N/A |
| **6. (a) Similar disposed of matter with citation, if any, & case** | **No similar matter is disposed of** |
| **(b) Similar pending matter with case details** | **No similar matter is pending** |
| 7. Criminal Matters : | |
| (a) Whether accused/ convict has surrendered : | No |
| (b) FIR No. Date | N/A |
| (c) Police Station : | N/A |
| (d) Sentence Awarded : | N/A |
| (e) Sentence Undergone: | N/A |
| 8. Land Acquisition Matters : | |
| (a) Date of Section 4 notification : | N/A |
| (b) Date of Section 6 notification : | N/A |
| (c) Date of Section 17 notification : | N/A |
| 9. Tax Matters : State the tax effect : | N/A |
| 10. Special Category (first petitioner/ appellant only) : | N/A |
| Senior citizen > 65 years ☐ SC/ST ☐ Woman/Child, ☐ Disabled ☐ Legal Aid case ☐ In Custody | |
| 11. Vehicle Number (in case of Motor Accident Claim matters) : | N/A |

Date : 09.01.2020

AOR for petitioner(s)/appellant(s)
(Name) : Sachin Patil
Registration No. 2088
Mobile 9873901982 govtadvdelhi@gmail.com

**(iii)** बक्षी समितीचा अहवाल ज्यांनी काळजीपूर्वक वाचला असेल त्यांच्या असे लक्षात येईल की, असा गौरव फक्त उच्च शिक्षण विभागाच्याच वाट्याला आलेला आहे, दुसऱ्या कोणत्याही विभागाच्या नाही. आपल्या पदाचा अशारितीने उपभोग घेणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कर्तृत्वाचा भोग गेली दहा पंधरा वर्षे हे नेट-सेट मुक्त शिक्षक भोगत आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या सात खंडपीठाचे व सर्वोच्च न्यायालयाच्या तीन खंडपीठांचे निर्णय झाल्यावर आरती ओवाळण्याचा कार्यक्रम या अधिकाऱ्यांना गुंडाळावाच लागेल.

**७.** मा.उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या सात खंडपीठांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या बाबतीत या शिक्षकांच्या बाजूने निर्णय दिला होता. यापैकी कोणत्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करावयाची किंवा करावयाच्या हे उच्च शिक्षण विभागात लहरीनुसारच ठरत होते, असे दिसून येते. याचे बरेच तपशील मी सन २०२० च्या नुटा बुलेटीनच्या पहिल्या अंकातील "**दिवाळसण' साजरे करण्यासाठी वर्षातून किती 'पोरखेळ' करावयाचे हे एकदा उच्च शिक्षण विभागाने ठरवून टाकले पाहिजे !**" या लेखामध्ये नमूद केलेले आहेत. पहिल्या प्रकरणामध्ये मा.खंडपीठाने दिलेल्या निर्णयाला राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिकेच्या माध्यमातून आवाहन दिले होते. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ जुलै २०१९ रोजी राज्यशासनाची ही विशेष अनुमती याचिका फेटाळून (dismissed) लावली. वस्तुतः सर्वोच्च न्यायालयामध्ये एखादी विशेष अनुमती याचिका फेटाळून लावल्यानंतर त्या प्रकरणातील हा निर्णय अंतिम होऊन तत्सम प्रकरणी तत्सम न्याय देण्याची कृती पार पाडणे हे उच्च शिक्षण विभागाचे कार्य होय. परंतु असे लक्षात येते की, उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी लहान लहानशा प्रकरणात उच्च न्यायालयाने दिलेले निर्णय गळ्याला भिडेपर्यंत मानायचे नाहीत व सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करावयाची व शिक्षकांचा जाणूनबुजून छळ करावयाचा असे धोरण स्वीकारल्याचे दिसून येते. हायकोर्टाच्या एका निर्णयाबाबत विशेष अनुमती याचिका फेटाळून लावल्यानंतर सुद्धा तत्सम प्रकरणी कायद्याची स्थिती व वस्तुस्थिती सारखी असलेल्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयामध्ये जाण्याचा निर्णय या अधिकाऱ्यांनी घ्यावा ही गोष्ट अतिशय विचित्र अशी म्हणावी लागेल. यापूर्वीच्या लेखामध्ये "हे 'चित्र' पहा आणि हे 'विचित्र' पहा" या मथळ्याखाली याबाबतचे तपशील मी नमूद केलेले आहेत.

**८.** सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रा.विजय बाबुराव रणपिसे (Diary No. 1076/ 2020) या प्रकरणात उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी जी विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल केली, ती काळजीपूर्वक पाहिली तर या अधिकाऱ्यांचा प्रवास चित्र विचित्रपणाच्या बराच पुढे गेला असे दिसून येते. प्रत्येक विशेष अनुमती याचिकेसोबत सर्वोच्च न्यायालयाच्या नियमाप्रमाणे अगदी सुरूवातीलाच "PROFORMA FOR FIRST LISTING" या मथळ्याचा एक प्रोफॉर्मा (तक्ता) जोडावा लागतो. नियमाप्रमाणे निरनिराळ्या ११ मुद्यांबाबतची माहिती त्या प्रोफॉर्मामध्ये भरून द्यावी लागते. रणपिसे प्रकरणात अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर या विशेष अनुमती याचिकेसोबत जोडलेला प्रोफॉर्मा **सहपत्र : एक** म्हणून शब्दशः जसाच्या तसा सोबत प्रसृत करण्यात आलेला आहे. त्यातील (6) (a) व (b) मध्ये भरावयाची माहिती व भरलेली माहिती एकमेकांसमोर ठेऊन त्यातील धादांत खोटारडेपणा नमूद करणारा संघटनेनी तयार केलेला एक तक्ता सोबत **सहपत्र : दोन** म्हणून दिलेला आहे.

**९.** विजय रणपिसे प्रकरणामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करतांना कागदपत्रे न वाचताच उच्च शिक्षण विभागातील अधिकारी बिगार भरल्यासारखे कसे काम करतात? याचा एक उत्तम नमूना लक्षात घेण्यासारखा आहे. या प्रकरणामध्ये दाखल करण्यात आलेली विशेष अनुमती याचिका ही एकूण २४१ पृष्ठांची आहे. त्यामध्ये पृष्ठ ४० पासून तर पृष्ठ २३३ पर्यंत म्हणजे जवळ जवळ १९४ पृष्ठे मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने सन २०१३ च्या याचिका क्रमांक २०८२ मध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ विरुद्ध महाराष्ट्र राज्य या प्रकरणात २३ डिसेंबर २०१५ रोजी दिलेला निर्णय जोडण्यात आलेला आहे. २४१ पृष्ठांच्या या विशेष अनुमती याचिकेमध्ये जवळ जवळ १९४ पृष्ठांचा उच्च न्यायालयाचा हा निर्णय आहे.

**९.१** मा.उच्च न्यायालयाचा हा निर्णय 'कॅस'चे लाभ देण्याच्या विरोधात गेलेला एकमेव निर्णय म्हणून सांगता येईल. पण हा निर्णय जुन्या पेन्शन योजनेच्या विरोधात आहे असे मात्र म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे, कारण याच निर्णयाच्या परिच्छेद ३७ मध्ये मा.उच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे :-

"There is no issue that non-NET/SET teachers, inspite of no requisite qualification of NET/SET have been getting pay Commission's scale, HRA, Leave Travel Allowance, DA, TA and all other related benefits, including increments and pension and gratuity." *(P48NB2016)*

९.२ जुन्या पेन्शन योजनेच्या बाबतीत हा निर्णय या शिक्षकांच्या बाजूने आहे. 'कॅस'च्या बाबतीत या शिक्षकांच्या विरोधात गेलेला उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचा हा एकमेव निर्णय आहे, हे खरे असले तरी या निर्णयानेच (परिच्छेद ८८) या निर्णयाला स्थगिती देऊन ठेवली आहे. ती पुढील शब्दात :-

"..... we are inclined to observe that **this judgment shall not be given effect, so far as the order of vacating interim orders are concerned, till the Supreme Court passes an appropriate order.**" (*P57NB2016*)

त्या निर्णयावरील ही स्थगिती अजून उठलेली नाही. ती फक्त सर्वोच्च न्यायालयच उठवू शकते. तशी ती सर्वोच्च न्यायालयाने अजून उठविलेली नाही.

९.३ महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या कॅस विरोधात सन २०१३ च्या याचिका क्रमांक २०८२ मध्ये जो निर्णय दिलेला आहे, त्यावर एक तपशीलवार ठराव मंजूर केला. त्यातील परिच्छेद ६ पुढीलप्रमाणे आहे. :-

"(६) पेन्शन व ग्रॅच्युईटी च्या संदर्भात आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ३७ मध्ये मा. खंडपीठाने पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे :-

"PENSION AND GRATUITY : There is no issue that non-NET/SET teachers, inspite of no requisite qualification of NET/SET have been getting pay Commission's scale, HRA, Leave Travel Allowance, DA,TA and all other related benefits, including increments and pension and gratuity." (See Para 37 of the Judgment)

मात्र याच निर्णयाच्या परिच्छेद ९१ (३) मध्ये पुढीलप्रमाणे त्या विरोधात आदेशित केलेले आहे :-

"The challenge to the validity of the impugned State Government Resolution dated 27 June 2013 is rejected. The action of the State of Maharashtra is upheld." (See Para 91 (3) of the Judgment)

**ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**" (*P63NB2016*)

९.४ मा. उच्च न्यायालयाचा हा निर्णय जुन्या पेन्शन योजनेच्या विरोधात नाही, तो 'कॅस'च्या विरोधात असला तरी त्या निर्णयाने स्वतःच स्वतःला स्थगिती देऊन ठेवली आहे; महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने तपशीलवार ठराव करून या बाबी लक्षात आणून दिल्या. हे वाचायला उच्च शिक्षण विभागात कुणाला वेळ नाही. हे इतके सारे वाचत बसायचे तर उच्च शिक्षण विभागात नोकरी कशासाठी करावयाची? १९४ पृष्ठांचा निकाल SLP ला जोडून दिल्याबरोबर समोरच्याची छाती दडपून जावी एवढी ती SLP "लई भारी" होते, यातच धन्यता मानण्यात अधिकारी आनंद घेतात. १९४ पृष्ठांचा हा ग्रंथ राजेश पांडे विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या तिसऱ्या SLP ला सुद्धा जोडला आहे. त्यामुळे ती SLP सुद्धा भारदस्त झाली आहे.

१०. पहिल्या प्रकरणात विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयात फेटाळल्या गेल्यानंतर सुद्धा उच्च शिक्षण विभागाने पुक्टोच्या परिक्षेत्रातील प्रा.विजयकुमार बाबुराव रणपिसे (Diary No. १०७६/२०२०) व नुटाच्या परीक्षेत्रातील प्रा. राजेश वसंतराव पांडे (Diary No. १३०९/२०२०) यांच्या बाबतीत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल केली. वर वर पाहता हे या दोन शिक्षकांचे वैयक्तिक प्रकरण आहे असे कोणालाही वाटेल, पण ते तसे नव्हते. या प्रकरणात होणारा सर्वोच्च न्यायालयाचा बरावाईट निर्णय तत्सम सर्वांना चाटून जाणार हे निश्चित होते. दोनही घटक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी या संदर्भात ज्येष्ठ

(सहपत्र दोन : परिच्छेद १२.२ पहा.)

In Special Leave Petition (Civil) Diary No(s).1076/2020.

## PROFORMA FOR FIRST LISTING

*हा तक्ता भरतांना (6) (a) व (b) मध्ये भरावयाची माहिती व भरलेली माहिती एकमेकांसमोर ठेऊन त्यातील धादांत खोटारडेपणा नमूद करणारा*

## *तक्ता*

| *भरावयाची माहिती* | *भरलेली माहिती* | *धादांत खोटारडेपणा नमूद करणारी माहिती* |
|---|---|---|
| *१* | *२* | *३* |
| 6. (a) Similar disposed of matter with citation, if any, & case | No similar matter is disposed of | *अधिकाऱ्यांनी भरलेली माहिती धादांत खोटारडेपणाची आहे.*<br>*खरी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-*<br><br>Yes, similar matter is disposed of on 01.07.2019. Citation and case details are as follows :-<br><br>(1) SLP No : Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019. (2) Arising out of impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay. (3) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) **VERSUS** Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) (4) Date of Order : 01-07-2019. |
| (b) Similar pending matter with case details | No similar matter is pending | *अधिकाऱ्यांनी भरलेली माहिती धादांत खोटारडेपणाची आहे.*<br>*खरी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-*<br>Yes, similar matter is pending. Following are the case details :-<br><br>(1) SLP No : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1309/2020. (2) Arising out of impugned final judgment and order dated 29-07-2019 in WP No. 2068/2019 passed by the High Court of Judicature at Bombay At Nagpur. (3) The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) **VERSUS** Rajesh Vasantrao Pande & Anr. Respondent(s). |

अधिवक्ता श्री.बी.एच.मर्लापल्ले व AOR म्हणून श्री.आर.आर.देशपांडे यांची सेवा घ्यावी असा निर्णय घेतला. दिनांक ३ फेब्रुवारी रोजी याबाबत विधीज्ञांची वेळ घेऊन चर्चा (Conference) ठरविली. नुटाच्या वतीने प्रा. डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. नितीन कोंगरे, प्रा. विलास ठाकरे व पुक्टोच्या वतीने प्रा. डॉ. गिरमकर, प्रा. प्रकाश वाळूंज यांनी विधिज्ञांसोबत दि.३.२.२०२० रोजी नवी दिल्ली येथे तपशीलवार चर्चा केली. मा.उच्च न्यायालयाचे सातही निर्णय, पहिल्या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय, तसेच या प्रकरणाशी संबंधित सारी कागदपत्रे संघटनेने विधिज्ञांच्या सुपूर्द केली. दोन्ही प्राध्यापकांच्या

(सहपत्र तीन : परिच्छेद १२.३ पहा.)

**PROFORMA FOR FIRST LISTING**

Section : IX

| | |
|---|---|
| The case pertains to (Please tick/ check the Correct box) : | |
| Central Act : | N/A |
| Section : | N/A |
| Central Rule : | N/A |
| Rule No(s) : | N/A |
| State Act : | N/A |
| Section : | N/A |
| State Rule : | N/A |
| Rule No(s) : | N/A |
| Impugned Interim Order : | N/A |
| Impugned Final Order/Decree : | 29.07.2019 |
| High Court : | High Court of Judicature at Bombay |
| Names of Judges : | Sunil B. Shukre & S.M.Modak, JJ |
| Tribunal/Authority : | N/A |
| 1. Nature of matter : | Civil |
| 2. (a) Petitioner/ appellant No. : | State of Maharashtra & Ors. |
| (b) e-mail ID : | govtadvdelhi@gmail.com |
| (c) Mobile Phone number | N/A |
| 3. (a) Respondent : | Rajesh Vasantrao Pande & Anr. |
| (b) e-mail ID : | N/A |
| (c) Mobile Phone number | N/A |
| 4. (a) Main category classification : | 18 |
| (b) Sub classification : | 1807 (Ors) |
| 5. Not to be listed before : | N/A |
| **6. (a) Similar disposed of matter with citation, if any, & case :** | **No similar matter is disposed of** |
| **(b) Similar pending matter with case details** | **No similar matter is pending** |
| 7. Criminal Matters : | |
| (a) Whether accused/ convict has surrendered : | No |
| (b) FIR No. Date : | N/A |
| (c) Police Station : | N/A |
| (d) Sentence Awarded : | N/A |
| (e) Sentence Undergone: | N/A |
| 8. Land Acquisition Matters : | |
| (a) Date of Section 4 notification : | N/A |
| (b) Date of Section 6 notification : | N/A |
| (c) Date of Section 17 notification : | N/A |
| 9. Tax Matters : State the tax effect : | N/A |
| 10. Special Category (first petitioner/ appellant only) : | N/A |
| Senior citizen > 65 years ☐ SC/ST ☐ Woman/Child, ☐ Disabled ☐ Legal Aid case ☐ In Custody | |
| 11. Vehicle Number (in case of Motor Accident Claim matters) : | N/A |

Date : 10.01.2020

AOR for petitioner(s)/appellant(s)
(Name) : Sachin Patil
Registration No. 2088
Mobile 9873901982 govtadvdelhi@gmail.com

वतीने ॲडव्होकेट ऑन रेकार्ड (AOR) ॲड. आर.आर. देशपांडे हे काम पाहत होते. दुपारी ११.३० वाजता जेष्ठ विधिज्ञ ॲड. बी.एच.मार्लापर्ले यांचेशी चर्चा करण्याकरिता, सर्वोच्च न्यायालयातील यथोचित दालनांत प्रवेश करण्याकरिता प्रवेशपत्रिका उपलब्ध होण्याचे कामी ॲड. आर.आर.देशपांडे (AOR) यांची या प्रतिनिधी मंडळाला मदत झाली. सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य इमारतीमधील पहिल्या माळ्यावरील नियोजित कक्षामध्ये ही चर्चा झाली. जवळपास ४५ मिनीटे ॲड मार्लापर्ले व ॲड देशपांडे यांचे सोबत चर्चा होऊन त्यांना याचिकांच्या बाबतीत असलेल्या लहानसहान बारकाव्यांची स्पष्टीकरणे देण्यात आली. लिस्टिंग प्रोफॉर्मामध्ये केलेला खोटारडेपणा तसेच १९४ पानाचा जाडजुड निर्णय SLP सोबत अकारण जोडलेला असून तो निर्णय जुन्या पेन्शन योजनेच्या विरुद्ध नसून त्याने स्वत:च स्वत:ला स्थगिती दिली आहे, या बाबी संघटनेच्या अधिवक्त्यांच्या लक्षात आणून देण्यात आल्या. तपशीलवार चर्चा केल्यानंतर दुपारी २.०० वाजता ही चर्चा संपली. ३ फेब्रुवारी २०२० रोजी दिल्ली येथे मुळात विधीज्ञांशी चर्चा करण्यासाठी जाणाऱ्या प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्त्व डॉ.एस.पी.लवांडे यांनी करावे असे ठरले होते, पण त्याच तारखेला मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी मुंबई येथे बोलाविलेल्या बैठकीमुळे ही जबाबदारी डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी पार पाडावी असे ठरले. मुंबई येथे नुटाच्या वतीने प्रा. सतेश्वर मोरे उपस्थित राहतील असे ठरले.

**११.** प्रा.विजय रणपिसे यांचे प्रकरण दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी मा.सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीला आले. राज्य शासनाची विशेष अनुमती याचिका डिसमिस करण्यात आली. प्रा.राजेश पांडे यांचे प्रकरण दिनांक १७ फेब्रुवारी २०२० रोजी मा.सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीला आले. राज्य शासनाची विशेष अनुमती याचिका डिसमिस करण्यात आली. मा.सर्वोच्च न्यायालयाने आतापावेतो राज्यशासनाच्या विशेष अनुमती याचिका डिसमिस करणारे तीन निर्णय दिलेले आहेत. त्याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे :-

## मा. सर्वोच्च न्यायालयाचा पहिला निर्णय

**११.१** नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या सेवा २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाने नियमित केल्या म्हणजे काय केले? याबाबतच्या मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठांनी दिलेल्या निर्णयाकडे दुर्लक्ष करून राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली पहिली विशेष अनुमती याचिका (SLP) सर्वोच्च न्यायालयाने 'डिसमिस' केली. त्याचे तपशील पुढीलप्रमाणे :- **(1) SLP No :** Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019. **(2) Arising out of** impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay. **(3)** The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) **Versus** Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) **(4) Date of Order :** 01-07-2019. **(5) Coram :** Hon'ble Dr. Justice D.Y. Chandrachud Hon'ble Ms. Justice Indira Banerjee. **(6) Order :** Delay condoned. In the facts and circumstances of the present case and since the services of the first respondent were duly approved, we see no reason to entertain the Special Leave Petition. The Special Leave Petition is accordingly dismissed. Pending application, if any, stands disposed of. *(P117NB2019)*

## मा. सर्वोच्च न्यायालयाचा दुसरा निर्णय

**११.२** राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली दुसरी विशेष अनुमती याचिका (SLP) सर्वोच्च न्यायालयाने 'डिसमिस' केली. त्याचे तपशील पुढीलप्रमाणे :- **(1) SLP No :** Special Leave Petition (Civil) Diary No(s).1076/2020. **(2) Arising out of** impugned final judgment and order dated 09-04-2019 in WP No. 755/2019 passed by the High Court of Judicature at Bombay. **(3)** The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) **Versus** Ranpise Vijaykumar Baburao & Ors. Respondent(s). **(4) Date of Order :** 07-02-2020. **(5) Coram :** Hon'ble Dr. Justice D.Y. Chandrachud Hon'ble Ms. Justice Indu Malhotra. **(6) Order :** Delay condoned. We are not inclined to entertain the Special Leave Petition under Article 136 of the Constitution of India. The Special Leave Petition is accordingly dismissed. Pending applications, if any, are disposed of. *(P14NB2020)*

## मा. सर्वोच्च न्यायालयाचा तिसरा निर्णय

**११.३** राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली तिसरी विशेष अनुमती याचिका (SLP) सर्वोच्च न्यायालयाने 'डिसमिस' केली. त्याचे तपशील पुढीलप्रमाणे :- **(1) SLP No :** Special Leave Petition (Civil) Diary No(s).1309/2020. **(2) Arising out of** impugned final judgment and order dated 29-07-2019 in WP No. 2068/2019 passed by the High Court of Judicature at Bombay At Nagpur. **(3)** The

State of Maharashtra & Anr. Petitioner(s) **Versus** Rajesh Vasantrao Pande & Anr. Respondent(s). **(4) Date of Order :** 17-02-2020. **(5) Coram :** Hon'ble Dr. Justice D.Y. Chandrachud Hon'ble Mr. Justice Hemant Gupta. **(6) Order :** Delay condoned. We are not inclined to entertain the Special Leave Petition under Article 136 of the Constitution of India. The Special Leave Petition is accordingly dismissed. Pending applications, if any, are disposed of. *(P15NB2020)*

## *उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयासमोर असत्य माहिती दाखल करणे*

**१२.** महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागातील अधिकारी सर्वोच्च न्यायालयासमोर सुद्धा शपथपत्रावर धडधडीत असत्य माहिती दाखल करतात, हे केवळ आश्चर्यकारक नव्हे तर खेदजनक सुद्धा आहे. ही बाब मी तपशीलाने नमूद करण्याचे ठरविले आहे. वस्तुतः सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करतांना सर्वोच्च न्यायालयातील शासकीय अधिवक्त्यांना योग्य ती माहिती पुरविणे याबाबतची जबाबदारी विशिष्ट अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आलेली असते. ज्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे, ते अधिकारी किती बेजबाबदारपणे काम करतात व धडधडीत असत्य माहिती सर्वोच्च न्यायालयासमोर सादर करतात याचे पुरावे नमूद करणे आवश्यक आहे. या परिच्छेदामध्ये :-

**(i)** पहिले प्रकरण याचा अर्थ मारुती दत्तात्रय पाटील विरुद्ध महाराष्ट्र शासन या वादी प्रतिवादी मध्ये मा.उच्च न्यायालयाने सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये दिनांक ०३.१०.२०१८ रोजी ज्या प्रकरणी निर्णय दिला ते प्रकरण होय.

**(ii)** दुसरे प्रकरण याचा अर्थ विजयकुमार बाबुराव रणपिसे विरुद्ध महाराष्ट्र शासन या वादी प्रतिवादी मध्ये मा.उच्च न्यायालयाने सन २०१९ च्या याचिका क्रमांक ७५५ मध्ये दिनांक ०९.०४.२०१९ रोजी ज्या प्रकरणी निर्णय दिला ते प्रकरण होय.

**(iii)** तिसरे प्रकरण याचा अर्थ राजेश वसंतराव पांडे विरुद्ध महाराष्ट्र शासन या वादी प्रतिवादी मध्ये मा.उच्च न्यायालयाने सन २०१९ च्या याचिका क्रमांक २०६८ मध्ये दिनांक २९.०७.२०१९ रोजी ज्या प्रकरणी निर्णय दिला ते प्रकरण होय.

**१२.१** सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करतांना एका तक्त्यामध्ये माहिती भरून तो तक्ता विशेष अनुमती याचिकेसोबत वर जोडावा लागतो. या तक्त्यात भरावयाची माहिती ही सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांनी ठरवून दिलेली आहे. "PROFORMA FOR FIRST LISTING" असे या तक्त्याचे नाव असून त्यामध्ये या प्रकरणी हायकोर्टाचा निर्णय केव्हा झाला? व तेथे न्यायमूर्ती कोण होते? ही माहिती भरावी लागते. त्याबाबतीत भरलेली माहिती बिनचूक असल्यामुळे त्याबाबत कोणताही वाद नाही.

**१२.२** दुसऱ्या प्रकरणामध्ये "PROFORMA FOR FIRST LISTING" भरतांना ६ (अ) व (ब) या दोनही विचारणेला अधिकाऱ्यांनी अत्यंत असत्य माहिती भरलेली आहे. दुसऱ्या प्रकरणात शासनातर्फे दाखल करण्यात आलेला PROFORMA सोबत **सहपत्र : एक** म्हणून प्रसृत केलेला आहे. वरवर नजर फिरविली तरी ६(अ) आणि ६ (ब) या रकान्यात भरलेली माहिती असत्य आहे, हे कोणाच्याही लक्षात येईल. भरण्यात आलेली माहिती ही असत्य आहे, एवढे नमूद करून न थांबता याबाबत दुसऱ्या प्रकरणी सत्य माहिती काय आहे? ती नमूद असलेला तक्ता **सहपत्र : दोन** म्हणून सोबत प्रसृत केलेला आहे.

**१२.३** तिसऱ्या प्रकरणामध्ये "PROFORMA FOR FIRST LISTING" भरतांना ६ (अ) आणि (ब) या दोनही विचारणेला अधिकाऱ्यांनी अत्यंत असत्य माहिती भरलेली आहे. तिसऱ्या प्रकरणात शासनातर्फे दाखल करण्यात आलेला PROFORMA सोबत **सहपत्र : तीन** म्हणून प्रसृत केलेला आहे. वरवर नजर फिरविली तरी ६(अ) व ६ (ब) या रकान्यात भरलेली माहिती असत्य आहे, हे कोणाच्याही लक्षात येईल. भरण्यात आलेली माहिती ही असत्य

(सहपत्र चार : परिच्छेद १२.३ पहा.)

In Special Leave Petition (Civil) Diary No(s).1309/2020.

**PROFORMA FOR FIRST LISTING**

*हा तक्ता भरतांना (6) (a) व (b) मध्ये भरावयाची माहिती व भरलेली माहिती एकमेकांसमोर ठेऊन त्यातील धादांत खोटारडेपणा नमूद करणारा*

***तक्ता***

| *भरावयाची माहिती* | *भरलेली माहिती* | *धादांत खोटारडेपणा नमूद करणारी माहिती* |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| 6. (a) Similar disposed of matter with citation, if any, & case | No similar matter is disposed of | *अधिकाऱ्यांनी भरलेली माहिती धादांत खोटारडेपणाची आहे.*<br>*खरी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-*<br>Yes, similar matter is disposed of on 01.07.2019. Citation and case details are as follows :-<br>(1) SLP No : Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019. (2) Arising out of impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay. (3) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) **VERSUS** Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) (4) Date of Order : 01-07-2019. |
| (b) Similar pending matter with case details | No similar matter is pending | *अधिकाऱ्यांनी भरलेली माहिती धादांत खोटारडेपणाची आहे.*<br>*खरी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-*<br>Yes, similar matter is pending. Following are the case details :-<br>(1) SLP No : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1076/2020. (2) Arising out of impugned final judgment and order dated 09-04-2019 in WP No. 755/2019 passed by the High Court of Judicature at Bombay. (3) The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) **VERSUS** Ranpise Vijaykumar Baburao & Anr. Respondent(s). |

आहे, एवढे नमूद करून न थांबता याबाबत तिसऱ्या प्रकरणी सत्य माहिती काय आहे? ती नमूद असलेला तक्ता **सहपत्र : चार** म्हणून सोबत प्रसृत केलेला आहे.

१२.४ दुसऱ्या व तिसऱ्या प्रकरणात **"PROFORMA FOR FIRST LISTING"** या तक्त्याच्या स्तंभ सहामध्ये (अ) आणि (ब) रकान्यात सर्वोच्च न्यायालयामध्ये तत्सम प्रकरण निकाली निघाले आहे काय? अशी एक विचारणा करण्यात आलेली आहे. त्या विचारणेला शासनातर्फे नकारार्थी उत्तर देण्यात आले आहे. मूळ विचारणा व त्याला दिलेले उत्तर पुढीलप्रमाणे :- **(१) तक्त्याप्रमाणे मूळ विचारणा** : 6. (a) Similar disposed of matter with citation, if any, & case. **(२) त्यावर अधिकाऱ्यांनी दाखल केलेले उत्तर** : No similar matter is disposed of. तसेच ६ (ब) मध्ये तत्सम प्रकरण प्रलंबित आहे काय? या विचारणेलासुद्धा नकारार्थी उत्तर देण्यात आले होते. ते पुढीलप्रमाणे :- **(१) तक्त्याप्रमाणे मूळ विचारणा** : (b) Similar pending matter with case details. **(२) त्यावर अधिकाऱ्यांनी दाखल केलेले उत्तर** : No similar matter is pending. दोनही प्रकरणात ६ (अ) व ६ (ब) च्या रकान्यात **भरलेली माहिती ही पूर्णपणे असत्य आहे, हे सहपत्र : एक ते चारचे अवलोकन केल्यास स्पष्ट होते.**

१२.५ वस्तुतः उच्च शिक्षण विभागातील अवर सचिव श्री.विजय साबळे यांनी दुसऱ्या म्हणजे विजय रणपिसे प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिनांक ९ एप्रिल २०१९ रोजीच्या निर्णयाच्या विरोधात विशेष अनुमती याचिका दाखल करा असे पत्र (*P6NB20*) दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ रोजी संचालक उच्च शिक्षण, पुणे यांना पाठविले होते. हे पत्र पाठवितांना मा.सर्वोच्च न्यायालयाने सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात तत्सम प्रकरणी म्हणजे पहिल्या प्रकरणात १ जुलै २०१९ रोजी आपली विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली ही गोष्ट विजय साबळे यांना ठाऊक होती. तसे त्यांनी ५ डिसेंबर २०१९ रोजी उच्च शिक्षण संचालक यांना लिहिलेल्या पत्रामध्ये नमूद केलेले होते. (*P6NB2020*) पहिल्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने १ जुलै २०१९ रोजी विशेष अनुमती याचिका फेटाळून लावलेली आहे. याची माहिती असल्याचे दिनांक ५ डिसेंबर २०१९ रोजीच्या पत्रान्वये मान्य केलेले असतांना ९ जानेवारी २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयामध्ये "No similar matter is disposed of " असे दाखल करणे हे अतिशय गंभीर स्वरूपाचे लबाडीचे कृत्य असून न्यायालयाच्या घोर अवमानाचा प्रश्न त्यात अंतर्भूत आहे. त्यातही चुकून एखादी असत्य माहिती सर्वोच्च न्यायालयासमोर ठेवण्यात आली, तर ती बाब क्षम्य नसली तरी गंभीर समजली जाते. इथे तर जाणूनबुजून, पहिले प्रकरण निकाली निघालेले आहे (disposed of) याची माहिती असतांना "No similar matter is disposed of " अशी असत्य माहिती सादर करण्यामध्ये नुसती अवमानना (Contempt) नव्हे तर मा.सर्वोच्च न्यायालयाची घोर अवमानना (Aggravated Contempt) होते, हे अधिकाऱ्यांच्या लक्षात येऊ नये हे उच्च शिक्षण विभागाचे दुर्दैव होय.

१२.६ एक एक शिक्षक कुठे सर्वोच्च न्यायालयात जाणार? कुठे कागदपत्रे पहाणार? अशी निर्ढावलेली भावना यामागे असू शकते. या प्रकरणी संघटनेचे प्रतिनिधी दोन दिवस अगोदरपासून दिल्लीत मुक्काम ठोकून होते. आपल्या अधिवक्त्यांशी अगोदरच्या दिवशी तपशीलवार चर्चा या प्रतिनिधी मंडळाने केली होती. शिक्षकांना आपले धोतर धुवायला वेळ अपुरा पडतो. तेव्हा अशा "अवमान धुलाई"च्या प्रकरणात शिक्षक कशाला पडतील? अशा निर्ढावलेपणाच्या पोटी अधिकाऱ्यांच्या हातून उपरोक्त प्रकार घडला असावा असे म्हणता येते. संघटनेच्या अधिवक्त्यांनी माहिती पुरविणाराने खोटी माहिती पुरविली आहे, हे मा.न्यायालयाच्या लक्षात आणून दिल्यावर व दिल्यामुळे सुनावणीत असलेल्या याचिकेबाबतीत त्याचे बरेवाईट परिणाम खोटी माहिती पुरविणाराला भोगावेच लागतात. पण तिथल्या तिथे अवमान केल्याबद्दल शिक्षा होत नाही. त्यासाठी स्वतंत्रपणे अवमान याचिका दाखल करावी लागते. व्यक्तीशः एक एक शिक्षक अशी अवमान याचिका दाखल करू शकत नाही व ते शक्यही नसते. अवमान याचिका दाखल करण्याचा विचार हा संघटीतपणेच होऊ शकतो.

**SIMILAR DISPOSED OF MATTER AND SIMILAR PENDING MATTER**

१२.७ "Similar disposed of matter and Similar pending matter" याबाबतीत पहिले प्रकरण दुसऱ्या प्रकरणाशी, दुसरे प्रकरण तिसऱ्या प्रकरणाशी "Similar" आहे किंवा नाही? याला धरून अधिकाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये, शिक्षका शिक्षकांमध्ये किंवा व्यक्ती व्यक्तींमध्ये वाद होऊ शकतो. मात्र याबाबतीत अधिकाऱ्यांना तसा आडोसा घेता येणार नाही, याचे मुख्य कारण म्हणजे ही तीनही प्रकरणे एकमेकांसारखी आहेत असे उच्च न्यायालयाच्या खंडपीठांनीच नमूद केलेले आहे. ते कसे याचे तपशील पाहू.

(i) पहिल्या प्रकरणामध्ये दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी मा.उच्च

*(सहपत्र : पाच परिच्छेद १३ पहा)*

***मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल अशा आदेशांच्या आतापर्यंत दिलेल्या निर्णयांचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत***

As on 22.02.2020

**(1)** In the High Court of Judicature at Bombay : Civil Appellate Jurisdiction : Writ Petition No. 13166 of 2017 Shri Maruti Dattatraya Patil..Petitioner Vs. The State of Maharashtra and ors...Respondents. **Date of Judgment : 03rd October, 2018** *(Full Text of the Judgment is printed on page 120 of 2018 NUTA Bulletin.)*

**(2)** In the High Court of Judicature at Bombay : Civil Appellate Jurisdiction : Writ Petition No.1219 of 2017 Rekha Naresh Pulekar ..Petitioner Versus Shree Shiv Shahu Mahavidyalay, Sharud, Taluka Shahuwadi, District Kolhapur and others ..Respondents. **Date of Judgment : 19th October, 2018** *(Full Text of the Judgment is printed on page 137 of 2018 NUTA Bulletin.)*

**(3)** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad : Writ Petition No. 1304 of 2016 Sharda Rajendra Aajbe..Petitioner Versus State of Maharashtra and Others..Respondents. **Date of Judgment :12th December, 2018** *(Full Text of the Judgment is printed on page 25 of 2019 NUTA Bulletin.)*

**(4)** In the High Court of Judicature at Bombay : Civil Appellate Jurisdiction : Writ Petition No. 755 of 2019 Ranpise Vijaykumar Baburao...Petitioner V/S. The State of Maharashtra & ors.Respondents. **Date of Judgment : 9th April 2019.** *(Full Text of the Judgment is printed on page 103 of 2019 NUTA Bulletin.)*

**(5)** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad : Writ Petition No. 3293 of 2019 Shankar Bhagwanrao Deshmukh..Petitioner Versus The State of Maharashtra and Others..Respondents. **Date of Judgment :18/06/2019** *(Full Text of the Judgment is printed on page 16 of 2020 NUTA Bulletin.)*

**(6)** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Nagpur : Writ Petition No. 2068 of 2019 Rajesh Vasantrao Pande..Petitioner Versus State of Maharashtra and Others..Respondents. **Date of Judgment : 29th July 2019.** *(Full Text of the Judgment is printed on page 134 of 2019 NUTA Bulletin.)*

**(7)** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad : Writ Petition No. 11316 of 2015 Bhanudas Vithalrao Kale...Petitioner V/S. The State of Maharashtra & ors.Respondents. **Date of Judgment : 28th August 2019.** *(Full Text of the Judgment is printed on page 02 of 2020 NUTA Bulletin.)*

**(1) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019 (Arising out of impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/ 2017 passed by the High Court of Judicature at Bombay) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) Versus Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) **Date of Judgment : 01-07-2019** *(Full Text of record of proceedings is printed on page 117 of 2019 NUTA Bulletin.)*

**(2) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1076/2020 (Arising out of impugned final judgment and order dated 09-04-2019 in WP No. 755/ 2019 passed by the High Court of Judicature at Bombay) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) Versus Ranpise Vijaykumar Baburao & Ors. Respondent(s) **Date of Judgment : 07-02-2020** *(Full Text of record of proceedings is printed on page 14 of 2020 NUTA Bulletin.)*

**(3) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1309/2020 (Arising out of impugned final judgment and order dated 29-07-2019 in WP No. 2068/ 2019 passed by the High Court of Judicature at Bombay Bench At Nagpur) The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) Versus Rajesh Vasantrao Pande & Anr. Respondent(s) **Date of Judgment : 17-02-2020** *(Full Text of record of proceedings is printed on page 15 of 2020 NUTA Bulletin.)*

*****

न्यायालयाने निर्णय दिला. त्या निर्णयामध्ये २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाने या शिक्षकांना नेट-सेट पासून मुक्ती दिली असल्यामुळे त्यांना जुनी पेन्शन योजनाच लागू होईल, तसेच त्या प्रयोजनार्थ त्यांची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासून धरली जाईल असे मा.खंडपीठाने पुढील शब्दात नमूद केलेले आहे :-

"It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination, M.Phil. and Ph.D.qualification."

"The Respondents are directed to make the pension applicable to the Petitioner on the basis of his last drawn salary."

"The pension is to be paid to the Petitioner from the month of November 2018. All the arrears between the date of superannuation till 31/10/2018 shall be cleared within a period of 3 months from today." *(P121NB2018)*

**(ii)** दुसरा निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक ९ एप्रिल २०१९ रोजी दिला. या दुसऱ्या निर्णयामध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट उल्लेख आहे :-

**"The issue is no more res integra.** The Division Bench of this Court of which one of us (Gavai, J) was a party, through judgment and order dated 3rd October 2018 in Writ Petition No.13166/2017 (Maruti Dattatraya Patil Vs. The State of Maharashtra and ors.)"

याचा सरळ अर्थ असा आहे की, हे दुसरे प्रकरण पहिल्या प्रकरणासारखेच आहे.

**(iii)** तिसऱ्या प्रकरणामध्ये मा.उच्च न्यायालयाचा निर्णय दिनांक २९ जुलै २०१९ रोजी झाला. या निर्णयामध्ये हे प्रकरण पहिल्या प्रकरणासारखेच आहे व पहिल्या प्रकरणातील निर्णय सर्वोच्च न्यायालयात कायम झाला आहे, असे स्पष्ट शब्दात नमूद केले आहे ते पुढीलप्रमाणे :-

**"It is not in dispute that the facts involved in this petition are identical to those involved in Writ Petition No. 13166 of 2017 which has been decided on 3.10.2018** by the Division Bench of this Court at main seat. **The said judgment has been confirmed by the Hon'ble Apex Court in SLP (C) No. 14703/ 2019 on 1.7.2019** when it dismissed the same. We, therefore, see no difficulty in allowing the present writ petition on the same line as has been done in WP No. 13166 of 2017." *(P134NB2019)*

**(iv)** खुद्द मा.न्यायमुर्तींनीच हे दुसरे व तिसरे प्रकरण पहिल्या प्रकरणासारखेच आहे, असे निर्णयातच नमूद केलेले असल्यामुळे व सर्वोच्च न्यायालयाने त्यावर शिक्कामोर्तब केले, ही वस्तुस्थिती ठाऊक असतांना कोणत्याही अधिकाऱ्याजवळ ती प्रकरणे तत्सम नाहीत असे म्हणण्याचा अधिकार शिल्लक राहत नाही.

**१३.** सन १९९२ ते २००० या काळामध्ये विधिवतरीत्या सेवेत आलेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल तसेच त्यांची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासूनच धरावी लागेल, याबाबतीत मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या खंडपीठांनी आतापावेतो सात निर्णय दिलेले आहेत. **(सहपत्र : पाच पहा.)** त्यातील निरनिराळ्या तीन निर्णयांच्या बाबतीत उच्च शिक्षण विभागाने दाखल केलेल्या निरनिराळ्या तीन विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्या आहेत. **(सहपत्र : पाच पहा.)** यातील सर्वोच्च न्यायालयाचा पहिला निर्णय दिनांक १ जुलै २०१९ रोजी व दुसरा निर्णय दिनांक ७ फेबुवारी २०२० रोजी झाला. हे दोनही निर्णय होत असतांना राज्यशासनाच्या वतीने सहसंचालक व सोबत अनेक अधिकारी सर्वोच्च न्यायालयात उपस्थित होते. सर्वोच्च न्यायालयातील शासनाच्या अधिवक्त्यांनी त्यांना हे निर्णय कळविलेसुद्धा. सर्वोच्च न्यायालयाचे हे दोन निर्णय ठाऊक झाल्यानंतरसुद्धा त्यांच्या अंमलबजावणीची तयारी करण्याऐवजी या शिक्षकांना नवीन पेन्शन योजनाच लागू करण्याचे कारस्थान उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी रचलेले आहे असे स्पष्टपणे दिसून येते. अशा अधिकाऱ्यांची एक बैठक मंत्रालयामध्ये दिनांक ११ फेब्रुवारी २०२० रोजी झाली असे दिसून येते. मा.उच्च न्यायालयाचे सात निर्णय व सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय मंत्र्यांना वगैरे दाखविण्याची कोणतीही आवश्यकता नाही असे ठरवून अधिकाऱ्यांनीच निर्णय घेतले. त्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार मंत्रालयाने संचालक, उच्च शिक्षण यांना १३ फेब्रुवारी २०२० रोजी एक आदेश **(सहपत्र : सहा)** पाठविला. त्या आदेशामध्ये स्पष्टपणे असे नमूद करण्यात आले आहे की, :-

"शासननिर्णय दि. २७.०६.२०१३ अन्वये या कालावधीत नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा ह्या शासननिर्णय निर्गमनाच्या दिनांकापासून नियमित केल्यामुळे त्यांना "नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू केली आहे. तरीसुद्धा त्यांना "नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू करणे शक्य झाले नाही. दि. २७.०६.२०१३ च्या शासननिर्णयान्वये सेवा नियमित केलेल्या अध्यापकांना डीसीपीएस क्रमांक दिला गेला नाही व परिणामी त्यांच्या वेतनातून नियमानुसार कपात झाली नाही. सदरहू कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन अथवा नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेतंर्गत मिळणारे लाभ या दोन्ही लाभांपासून वंचित राहत आहेत. त्यामुळे अशा अध्यापकांनी त्यांना सेवानिवृत्तीवेतन मिळावे यासाठी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या आहेत. मा.न्यायालयाने बऱ्याच याचिकांमध्ये याचिकाकर्ते यांच्या बाजूने निर्णय होत आहेत."

**१४.** दिनांक १३ फेब्रुवारी २०२० रोजी मंत्रालयातून आदेश निघाल्याबरोबर दुसऱ्याच दिवशी म्हणजे १४ फेब्रुवारी २०२० रोजी संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी सर्व सहसंचालकांना आदेश पारित केले. **(सहपत्र : सात)** दिनांक १४ फेब्रुवारी २०२० रोजी उच्च शिक्षण संचालकांनी सर्व विभागीय सहसंचालकांना जे आदेश पाठविले त्या आदेशाचा पहिलाच परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :-

"प्रस्तुत विषयात कळविण्यात येते की, शासननिर्णय दि. २७.०६.२०१३ अन्वये **दि. २३.१०.१९९२ ते दि. ०३.०४.२००० या कालावधीत नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा ह्या शासननिर्णय निर्गमनाच्या दिनांकापासून नियमित केल्या असल्यामुळे त्यांना "नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू होणेसंदर्भात** शासनस्तरावर दि. ११.०२.२०२० रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास तातडीने सादर करणेबाबत संदर्भीय दि. १३.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे."

*( सहपत्र सहा : परिच्छेद १३ पहा )*

### *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग*

क्रमांक : बैठक-२०२०/प्र.क्र.५३/२०/विशि-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**दिनांक : १३.०२.२०२०**

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

**विषय** : शासननिर्णय दि. २७.०६.२०१३ व अनुषंगिक न्यायालयीन प्रकरणांबाबत.

दि. २३.१०.१९९२ ते दि. ०३.०४.२००० या कालावधीत नियुक्त अध्यापकांना तत्कालीन वेळेस भविष्य निर्वाह निधी क्रमांक देण्यात आलेले असून नियमाप्रमाणे त्याबाबतची रक्कम कपात केली जात आहे/होती. शासननिर्णय दि. २७.०६.२०१३ अन्वये या कालावधीत नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा ह्या शासननिर्णय निर्गमनाच्या दिनांकापासून नियमित केल्यामुळे त्यांना "नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू केली आहे. तरीसुद्धा त्यांना "नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू करणे शक्य झाले नाही. दि. २७.०६.२०१३ च्या शासननिर्णयान्वये सेवा नियमित केलेल्या अध्यापकांना **डीसीपीएस क्रमांक दिला गेला नाही व परिणामी त्यांच्या वेतनातून नियमानुसार कपात झाली नाही.** सदरहू कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन अथवा नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेतंर्गत मिळणारे लाभ **या दोन्ही लाभांपासून वंचित राहत आहेत.** त्यामुळे अशा अध्यापकांनी त्यांना सेवानिवृत्तीवेतन मिळावे यासाठी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या आहेत. मा.न्यायालयाने बऱ्याच याचिकांमध्ये याचिकाकर्ते यांच्या बाजूने निर्णय होत आहेत.

२. अशा परिस्थितीमध्ये याबाबत ठोस निर्णय घेणे आवश्यक असल्याने प्रधान सचिव, लेखा व कोषागारे (वित्त विभाग) यांचेसोबत सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, उपसंचालक, लेखा व कोषागारे यांची दि. ११.०२.२०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीमध्ये प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली व प्रधान सचिव लेखा व कोषागारे यांनी सूचित केल्यानुसार कार्यवाही करण्यासाठी खालील मुद्यांची माहिती शासनास तातडीने सादर करावी.

१) उक्त नमूद कालावधीत (दि. २३.१०.१९९२ ते दि. ०३.०४.२०००) नियुक्त झालेल्या व जीपीएफ खाते उघडण्यात आलेले आहे अशा अध्यापकांची संख्या किती आहे.

२) जीपीएफ खाते उघडण्यात आलेल्या अध्यापकांच्या खात्यामध्ये जमा असलेली रक्कम किती आहे व त्यावरील व्याज किती परिगणित होत आहे, याबाबतचा तपशील.

३) संबंधित अध्यापकांना डीसीपीएस क्रमांक देऊन दि. २७.०६.२०१३ पासून संबंधित अध्यापकांच्या डीसीपीएस खात्यात शासनाच्या हिश्याची रक्कम जमा करावी लागणार असल्याने त्याचा शासनावर किती आर्थिक भार येईल.

(विजय साबळे)

शासनाचे अवर सचिव

** AF : P21 **

**१५.** उच्च शिक्षण संचालकांचे उपरोक्त पत्र काळजीपूर्वक वाचले तर, २३.१०.१९९२ ते ०३.०४.२००० या काळातील नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या सेवा नियमित केल्यामुळे या काळातील त्यांच्या सेवा धरावयाच्या नाहीत असा त्याचा अर्थ होतो व हा अर्थ उघडपणे पोरकटपणाचा आहे. सन १९९२ ते २००० या काळातील सेवा नियमित करण्यात आलेल्या आहेत म्हणजे त्या धरावयाच्या नाहीत हे व्याघात अलंकाराचे उदाहरण होय, हे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने वारंवार शिक्षण खात्याला समजावून सांगितले आहे. ते त्यांना अजूनही समजलेले नाही असे दिसते. पण आता त्यांना समजावून सांगण्यात वेळ घालविण्यात अर्थ नाही. २७ जून २०१३ च्या शासननिर्णयातील या वाक्याचा अर्थ काय होतो? हे मा.उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या सात खंडपीठांच्या निर्णयातून स्पष्ट करण्यात आलेले आहे. पण तो अर्थ पाहण्यासाठी उच्च शिक्षण संचालक व मंत्रालयातील उच्च शिक्षण विभागातील कोणत्याही अधिकाऱ्याला वेळ नाही असे स्पष्टपणे दिसून येते. मा.उच्च न्यायालयाचे सात निर्णय व मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय वाचण्यासाठी त्यांना निश्चितपणे वेळ मिळेल व ते निर्णय त्यांना समजून येण्यासाठी शिक्षकांना कोणत्या मार्गाने जावे लागेल, हे या शिक्षकांना व त्यांच्या संघटनांना निश्चितच ठाऊक आहे.

**१६.** राज्याच्या उच्च शिक्षण संचालकांनी १४ फेब्रुवारी २०२० रोजी पत्र पाठविल्याबरोबर त्याच दिवशी राज्यातील सर्व सहसंचालकांनी सर्व महाविद्यालयांना आदेश निर्गमित केले. सारेच घोडे सारखेच नाचत असल्यामुळे नमूना म्हणून एखाद्या घोड्याचा नृत्याविष्कार सादर केल्याने वाचकांचे मन भरून येईल. तत्परतेने म्हणजे १४ फेब्रुवारीला जळगाव येथील सहसंचालकांनी महाविद्यालयांना पाठविलेले पत्र नमूना म्हणून **(सहपत्र : आठ)** प्रसृत केलेले आहे. या पत्राच्या पहिल्याच परिच्छेदात ते म्हणतात :-

"उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, या विभागातील अशासकीय अनुदानित कला वाणिज्य विज्ञान विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये येथील नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा **शासननिर्णय दि.२७.०६.२०१३ अन्वये दि.२३.१०.१९९२ ते दि.३०.०४.२००० नियमित केल्या असल्यामुळे त्यांना नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होणे संदर्भात** शासन स्तरावर दि. ११.०२.२०२० रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास तातडीने करावयाची आहे."

**१७.** उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो कार्यक्रम आखलेला आहे त्यामागे एकमेव हेतू असा की, उच्च न्यायालयाच्या सात खंडपीठांनी निर्णय दिले असतील, सर्वोच्च न्यायालयाने तीन विशेष अनुमती याचिका फेटाळून लावल्या असतील तरीही आम्ही तुम्हाला नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनाच लागू करू. एक एक शिक्षक निवृत्त झाल्यानंतर उच्च न्यायालयात जाईल आणि तेथे दोन-तीन वर्षांनी निकाल लागेल त्यानंतर सुद्धा आम्ही त्या निर्णयाची अंमलबजावणी करणार नाही. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करू. ही विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात पूनर्विलोकन याचिका (Review Petition) दाखल करू. पूनर्विलोकन याचिका फेटाळल्यानंतर आम्ही Curative Petition दाखल करू. एक एका शिक्षकाला दोन-पाच वर्षे आम्ही असाच त्रास देऊ असा कार्यक्रम हाती घेण्याचे उच्च शिक्षण विभागाने ठरविले आहे, असे स्पष्टपणे दिसून येते. या कार्यक्रमाला कोणत्या प्रतिकार्यक्रमाने उत्तर द्यावयाचे एवढेच ठरविणे आता शिक्षकांसाठी शिल्लक राहिलेले आहे. ते काही फार कठीण असे काम नाही.

*****

*( सहपत्र सात : परिच्छेद १४ पहा )*

## *महाराष्ट्र शासन : उच्च शिक्षण संचालनालय*

मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य पुणे - ४११००१

Web : www.dhepune.gov.in E-mail : vidhi.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २३१३०६२७, २६१२४६३९

फॅक्स नं. ०२०/२६११११५३

क्र.उशिसं/२०२०/नेटसेट न्या.प्र./औवि/विशि./१९६०

**दि. १४.०२.२०२०**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण

**विषय** : शासननिर्णय दि. २७.०६.२०१३ व अनुषंगिक न्यायालयीन प्रकरणांबाबत

**संदर्भ** : शासनपत्र क्र. बैठक-२०२०/प्र.क्र. ५३/२०/वि.शि. १ दि. १३.०२.२०२०

प्रस्तुत विषयात कळविण्यात येते की, शासननिर्णय दि. २७.०६.२०१३ अन्वये दि. २३.१०.१९९२ ते दि. ०३.०४.२००० या कालावधीत नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा ह्या शासननिर्णय निर्गमनाच्या दिनांकापासून नियमित केल्या असल्यामुळे त्यांना "नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू होणेसंदर्भात शासनस्तरावर दि. ११.०२.२०२० रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास तातडीने सादर करणेबाबत संदर्भीय दि. १३.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

१. दि. २३.१०.१९९२ ते दि. ०३.०४.२००० या कालावधीत नियुक्त झालेल्या व जीपीएफ खाते उघडण्यात आलेले आहे अशा अध्यापकांची संख्या किती आहे?

२. जीपीएफ खाते उघडण्यात आलेल्या अध्यापकांच्या खात्यामध्ये जमा असलेली रक्कम किती आहे व त्यावरील व्याज किती परिगणित होत आहे, याबाबत तपशील.

३. संबंधित अध्यापकांना डीसीपीएस क्रमांक देऊन दि. २७.०६.२०१३ पासून संबंधित अध्यापकांच्या डीसीपीएस खात्यात शासनाच्या हिश्याची रक्कम जमा करावी लागणार असल्याने त्याचा शासनावर किती आर्थिक भार येईल.

तरी प्रस्तुत प्रकरणी पत्रासोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये आपल्या विभागाशी संबंधित सर्व अध्यापकांची माहिती संचालनालयास तातडीने सादर करावी.

**सोबत** : शासनाचे पत्र दि. १३.०२.२०२०

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**प्रत** : मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - यांना माहितीस्तव सविनय.

*** AF : P19 ***

*( सहपत्र आठ : परिच्छेद १६ पहा )*

## *महाराष्ट्र राज्य*

***सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव***

आकाशवाणी केंद्राजवळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पहिला मजला जळगाव

(दुरध्वनी फॅक्स क्र. ०२५७/२२३८५१०) Email : jdhe_jal@yahoo.co.in

जा.क्र.भनिनि/ससउशि/नेट/सेट/२०१९-२०/२८८

**दिनांक : १४.०२.२०२०**

प्रति,

अशासकीय अनुदानित कला वाणिज्य विज्ञान विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, जळगाव, धुळे, नंदुरबार

**विषय** : शासननिर्णय दि. २७.०६.२०१३ व अनुषंगिक न्यायालयीन प्रकरणांबाबत.

**संदर्भ** : मा.शिक्षण संचालनालयाचे पत्र जा.क्र.उशिस/२०२०/नेटसेट न्या.प्र. आर्वि/विशि/१९६० दि.१४.०२.२०२०

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, या विभागातील अशासकीय अनुदानित कला वाणिज्य विज्ञान विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये येथील नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा शासननिर्णय दि.२७.०६.२०१३ अन्वये दि.२३.१०.१९९२ ते दि.३०.०४.२००० नियमित केल्या असल्यामुळे त्यांना नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होणे संदर्भात शासन स्तरावर दि. ११.०२.२०२० रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास तातळीने करावयाची आहे.

१. दि. २३.१०.१९९२ ते दि. ०३.०४.२००० या कालावधीत निवृत्त झालेल्या व जीपीएफ खाते उघडण्यात आलेले आहे अशा अद्यापकांची संख्या.

२. जीपीएफ खाते उघडण्यात आलेल्या अद्यापकांच्या खात्यामध्ये जमा असलेली रक्कम किती आहे व त्यावरील व्याज किती परिगणित होत आहे. याबाबत तपशील.

३. संबंधित अद्यापकांना डीसीपीएस क्रमांक देऊन दि. २७.०६.२०१३ पासून संबंधित अद्यापकांच्या डीसीपीएफ खात्यात शासनाच्या हिश्याची रक्कम जमा करावी लागणार असल्याने त्याचा शासनावर किती आर्थिक भार येईल.

तरी प्रस्तुत प्रकरणी सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये आपल्या महाविद्यालयाची माहिती माहे फेब्रुवारी २०२० च्या वेतन देयकासोबत एक्सल सीट मध्ये सादर करावी. **जे महाविद्यालय सदरची माहिती सादर करणार नाही त्या महाविद्यालयाचे वेतन देयक स्वीकारता येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी मा. प्राचार्य यांची राहील.**

सहसंचालक
उच्च शिक्षण, जळगाव विभाग,जळगावकरिता

*** AF : P17 ***

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHER'S ORGANISATIONS
University Club House, B-Road, Churchgate, Mumbai 400 020

# RESOLUTION

**adopted by the Executive Committee of Maharashtra Federation of University and College Teachers' Organizations (MFUCTO) at its meeting held in Mumbai on 5th January 2020**

1.1 With the new government recently been formed in Maharashtra, there are expectation and hope that pending problems would be resolved. We, members of MFUCTO also are hopeful that the issues raised in our several memorandums would also be resolved to the satisfaction of the teachers of colleges and universities in Maharashtra.

1.2 A number of resolutions passed by the Executive Committee meetings of MFUCTO during the period of 2018 and 2019 were submitted to the appropriate offices. Unfortunately, none of the memorandums submitted to the previous government were either properly addressed to nor instructions were given to the appropriate departments for resolving the long pending issues (Exhibits E1 – E6).

1.3 Illustratively, two memorandums were submitted to the then Hon'ble Chief Minister, Shri Devendra Fadnavis and Hon'ble Higher and TechnicalEducation Minister Shri Vinod Tawde on April 29 2019 on certain issues relating to the revised pay scales and terms and conditions of the services of teachers.Mentioned below are two memorandums submitted sequentially to the University Grants Commission (UGC) and MHRD,Government of India

i) One memorandum submitted to Hon'ble Minister of HRD on "Violation of UGC Regulations (Gazette Notification), 2018 in the Government Resolutions dated 8th March 2019 and 10th May 2019, issued by Maharashtra Government, for implementing 7th Pay-revision and UGC Regulations, 2018."

ii) The above-mentioned memorandum, with the same content, was also submitted to The Chairman/Secretary, University Grants Commission, Bahadur Shah Zafar Marg, New Delhi.

1.4 While the details are fully explained in the above memorandum, it may be mentioned here briefly that following the revision of pay scales of central government employees on the recommendation of the7th Central Pay Commission, the government of India decided to approve the revised pay scales of teachers and equivalent academic staff in universities and colleges and centrally funded institutions from 1.1.2016. Thus, the scheme given and released by the Central government would be adopted by the state governments. The entire scheme together with the UGC regulations shall be implemented by the state governments for the universities and colleges coming under their jurisdiction as a composite scheme, without any modification, except in regard to the date of implementation and the pay scale mentioned above.

**2. UGC Regulations are Mandatory:**

2.1 In the first section of the Regulations (18th July 2018), under **1. Short Title...,** point no. 3 clearly states "3. If any University contravenes the provisions of these Regulations, the Commission after taking into consideration the cause, if any, shown by the University for such failure or contravention, may withhold from the University, the grants proposed to be made out of the Fund of the Commission". **With this clarification, it is apparent that these regulations are mandatory in nature.** It is stated in clause 1.2 of the Regulation, **under 1. Coverage**, "1.2 Every university or institution deemed to be University, as the case may be, shall as soon as may be, but not later than within six months of the coming into force of these Regulations, take effective steps for the amendment of the statutes, ordinances or other statutory provisions governing it, so as to bring the same in accordance with these Regulations."

2.2 Thus, it is clear that, each state government shall adopt UGC Regulation and implement it in letter and spirit to get the financial support from Central government**(???)**, for implementation of 7th pay-revision. It is also noted that this was the procedure followed during implementation of the 6thPay revision.It is also to be noted that if the state government fails to implement the notification or deviate from the basic order issued by the MHRD, they will lose the financial support. **As a consequence, state government will not be able to pay the arrears arising from 7th Pay-revision to college and university teachers.**

**2.3 Certain provisions of UGC Regulations omitted/ modified in 7th Pay revision GR dated 8th March 2019 and subsequent Corrigendum dated 10th May 2019 are as follows:**

1) Incentive increments for M.Phil./ Ph. D. acquired on or after 1.1.2016 are denied

2) Career Advancement from date of Interview instead of date of Eligibility

3) Extension to complete Refresher Course/Orientation Course till 31.12.2018 is denied

4) Provision to count period of active service spent on pursuing Research Degree, teaching experience is omitted

ITEM NO.11 COURT NO.12 SECTION IX

# SUPREME COURT OF INDIA

**RECORD OF PROCEEDINGS : SPECIAL LEAVE PETITION (CIVIL) Diary No(s). 1779/2020**

(Arising out of impugned final judgment and order dated 23-01-2019 in WP No. 1913/2013 23-01-2019 in WP No. 2290/2015 23-01-2019 in WP No. 2825/2014 08-11-2019 in NOM No. 275/2019 passed by the High Court Of Judicature At Bombay)

THE STATE OF MAHARASHTRA & ORS. Petitioner(s) ***VERSUS*** MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS ORGANIZATION & ORS. ETC. Respondent(s)

(FOR ADMISSION and I.R. and IA No.27367/2020-CONDONATION OF DELAY IN FILING and IA No.27368/2020-EXEMPTION FROM FILING C/C OF THE IMPUGNED JUDGMENT and IA No.27370/2020-EXEMPTION FROM FILING O.T. )

## Date : 02-03-2020

These petitions were called on for hearing today.

**CORAM :**

**HON'BLE MR. JUSTICE SANJAY KISHAN KAUL : HON'BLE MR. JUSTICE K.M. JOSEPH**

**For Petitioner(s)** Mr. Sachin Patil, AOR* Mr. Geo Joseph, Adv.* **For Respondent(s)** Mr. Guru Krishna Kumar. Sr. Adv.* Ms. Rukhsana Choudhury, AOR* Ms. Shruta Gopalan, Adv.*

UPON hearing the counsel the Court made the following

## ORDER

Delay condoned. We are not inclined to exercise our jurisdiction under Article 136 of the Constitution of India in the given facts of the case. The Special Leave Petitions are **DISMISSED.** Pending applications stand disposed of.

(ANITA RANI AHUJA) COURT MASTER (ASHA SUNDRIYAL) AR CUM PS

**परीक्षेचे काम शिक्षकांनी पार पाडल्यानंतरसुद्धा ७१ दिवसांचे त्यांचे वेतन कापल्या प्रकरणी राज्यशासनाची विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली**

5) Additional increment for bunching of more than 2 stages is denied

6) Provision to fill all sanctioned posts immediately is omitted

7) Regulation for Contractual appointments (procedure, Salary) is omitted

8) Provision for Counting of Past service, including Contract service is omitted

9) Provisions on Work-load and Teaching days are omitted

10) Principal's Scale, not on par with Professor's scale

11) UGC's Leave package is omitted

2.4 **Thus, the two GRs (dated 08/03/2018 and 10/05/2018) issued by Higher Education Department, in the State of Maharashtra contain many provisions contradicting the UGC Regulations-2018.**These GRs are grossly illegal and unconstitutional on at least two counts namely;

a) It is an attempt by the Higher Education Department, Government of Maharashtra to frame subordinate legislation on a subject entered at entry 66 in the Union List in the Seventh schedule of the Constitution of India.

b) It is an attempt to encroach upon the power of UGC conferred on it by section 26 of UGC Act, in as much as the aforesaid GRs provide provisions amounting to amending the UGC Regulations-2018.

**3. Autonomy of Universities Eroded:**

The aforesaid Government Resolutions are adopted by every University in Maharashtrathrough the directions issued by the Hon'ble Vice-Chancellors. This has led to violation of the directives to Universities by UGC as pointed out in para 2.1 above. It is grossly illegal and unconstitutional for the Universities in the State of Maharashtra to prescribe provisions contrary to the UGC Regulations-2018 and direct the colleges to implement it.**This act on the part of the Vice Chancellors has led to a serious breach of the autonomy of the universities in Maharashtra.**This is a repetition of the colonial period when Lord Curzon,who served as Viceroy of India (1899 to 1905) had firmly denied Autonomy to Indian universities on the ground that university autonomy in India was educationally unwise and politically dangerous (Ref: Sixty Years of the University Grants Commission)

**4. Movement Resolution submitted to Government of Maharashtra in July 2018:**

4.1A Movement Resolution was adopted in General CouncilMeeting of MFUTO held in Mumbai, June 17, 2018and was submitted to the Hon'ble Chief Minister and Hon'ble Higher and Technical Education Minister in July 2018.This Movement Resolution contained following Demands:

i) Immediate lifting of the ban on appointments and filling up of all vacancies on regular basis as per the UGC Quality Mandate and RUSA requirement for quality education.

ii) Immediate Release of 71 days' Salary for the period MARCH 1 – MAY 10, 2013.

iii) Immediate implementation of 7th Pay Revision Scheme for all sections of teachers.

iv) Scrapping of DCPS (New Pension Scheme) and extending Old Pension Scheme to all teachers

v) Well- regulated Salary scheme for disbursement of salaries through managements of unaided institutions as per para 89 of Hon'ble SC Order in CA 115– 116 of 2017.

vi) Implementation of the principle of "Equal Pay for Equal Work" as per Hon'ble SC Order in CA no. 213 of 2013.

vii) Immediate setting up of the Grievance Redressal mechanism consisting of a Committee of two or three retired or sitting Presiding Officers of the University & College Tribunals.

viii) Immediate Rectification of all anomalies of 6th Pay revision

ix) Increase the age of superannuation as per UGC regulations for all sections of teachers

x) Immediate issuance of Ordinance to reduce the proportion of nominations on authorities to protect democratic functioning of the Universities in the State

xi) Stop arbitrary functioning of the offices of the Joint director and Director of higher education.

4.2 The Movement Resolution also contained an 11 -point Action Plan. The Plan of Action contained, inter alia, a "State –wide Indefinite Cease Work from 25th September 2018". On the same day (September 25 2018), the government called a meeting of concerned parties including MFUCTO. Minutes of the meeting were given, which MFUCTO did not accept. Subsequently, government revised the minutes and gave assurance in writing to fulfill all demands **(Annexure B)**. But none of the demands were implemented, except the 7th Pay revision, which too was anomalous.

4.3. The Executive Committee of MFUCTO resolves to soon approach the state government with all pending issues as highlighted in **Annexure A** with the hope that the long pending demands of MFUCTO will be resolved through discussion.

Dr. Tapati Mukhopadhyay (President) Dr. S.P Lawande (General Secretary)

**ANNEXURE A : LIST OF PENDING ISSUES**

1) Non-payment of 7th Pay Arrears despite the decision of the Cabinet of Government of Maharashtra on 5th March 2019

2) Illegal and unconstitutional modification of UGC Regulations dated 18 July 2018 and composite scheme of MHRD Notification dated 2 November 2017

3) Huge backlog of vacant posts in violation of UGC Quality Mandate

4) Non-release of 71 days' Salary despite two High Court Orders

5) Restoration of Old Pension scheme

6) Unregulated disbursement of salaries in self-financing institutions and non-implementation of Hon'ble SC Order in CA 115– 116 of 2017

7) Non-implementation of 7th Pay-revision for Part-time teachers

8) Violation of all statutory service conditions in case of Contractual/ Ad hoc teachers and non-implementation of the principle of "Equal Pay for Equal Work" as per Hon'ble SC Order in CA no. 213 of 2013

9) Assault on democratic governance of universities due to rise in number of nominated members on various authorities

10) Rectification of Anomalies of 6th Pay-revision

11) Non-issuance of GRs in matters of confirmed Supreme Court Orders e.g. in matter of extension of pension to Net-Set exempted teachers

12) Arbitrary functioning of the offices of the Joint director and Director of higher education

13) Setting up of the Grievance Redressal mechanism consisting of a Committee of two or three retired or sitting Presiding Officers of the University & College Tribunals

Dr. Tapati Mukhopadhyay (President) Dr. S.P Lawande (General Secretary)

***महाराष्ट्र शासन : सहसंचालक (उच्च शिक्षण)***

१७, आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे - ४११ ००१

Website : www.jdhepune.org : E-mail : jdhepune@gmail.com

दुरध्वनी क्रमांक : ०२०-२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०-२६०५१६३२

*आ.क्र.शि.सस‌ं/उशि/पुवि/२०१९-२०/६४२ - मेलद्वारा*

**दिनांक : २७.२.२०२०**

प्रति,

मा. शासकीय विधीज्ञ, सरकारी वकील यांचे कार्यालय, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली

**विषय :** याचिका क्रमांक ७५५/२०१९ श्री.रणपिसे विजयकुमार बाबुराव, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इंदापूर जि. पुणे **विरुद्ध** महाराष्ट्र शासन व इतर.

**संदर्भ :** (१) आपले पत्र क्रमांक युएनआय/२०१८/या.क्र.१४३२५/१८/रणपिसे/विशि-१/८७४० दिनांक ०१.०८.२०१८ (२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक शिसस‌ं/उशि/पृवि/या.क्र. ७५५-२०१९/रणपिसे/सेनिवे/४२८ दिनांक १०.२.२०२०

महोदय,

उपरोक्त विषयी, श्री.रणपिसे विजयकुमार बाबुराव यांचे सेवानिवृत्ती वेतन प्रकरणासंदर्भात श्री रणपिसे यांचे विरुद्ध शासनाचे पत्र क्रमांक न्यायाप्र २०१९/प्र.क्र.२८७/वि.शि.-१ दिनांक २५.११.२०१९ मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका डायरी क्रमांक १०७६/२०२० अन्वये दिनांक ०९.०१.२०२० रोजी करण्यात आलेली होती.

सदर याचिका डायरी क्रमांक १०७६/२०२० मध्ये दिनांक ०७.०२.२०२० रोजी च्या आदेशाविरुद्ध पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याबाबत या कार्यालयाचे उक्त संदर्भ क्रमांक २ नुसार आपणांस विनंती केलेली आहे.

सदर निर्णय हा शासन धोरणाशी विसंगत आहे. यासंदर्भात अनेक विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असून सदर याचिकांवर या निर्णयाचा विपरीत परिणाम होवू शकतो म्हणून याद्वारे आपणांस डायरी याचिका क्रमांक १०७६/२०२० मध्ये देण्यात आलेल्या, मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांचे दिनांक ०७.०२.२०२० च्या आदेशाच्या विरुद्ध पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याबाबत आपले अभिमत मिळावे ही विनंती.

सोबत - १. याचिका डायरी क्रमांक १०७६/२०२० च्या आदेशाची प्रत.

आपला विश्वासू

(डॉ.मोहन खताळ) सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे-१

प्रत - (१) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर. (२) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीसाठी सविनय सादर

# युजीसी रेग्युलेशनची मोडतोड करण्याविरुद्धच्या दोनही याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या आहेत

- डॉ. प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष, 'नुटा'

**(A)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २२ सप्टेंबर २०१९ रोजी झालेल्या बैठकीत संमत झालेल्या ठराव क्रमांक एक मधील परिच्छेद ११ चा उपपरिच्छेद (iii) व (iv) पुढीलप्रमाणे आहे :-

**"(iii)** सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीबाबत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला असतांना उच्च शिक्षण विभागाने तेवढाच भाग लपवून ठेवणे किंवा तेवढाच भाग शासननिर्णयात नमूद न करण्याचे कृत्य हे संपूर्णपणे बेकायदेशीर व घटनाबाह्य होय. इतर कोणत्याही वर्गाच्या बाबतीत एक रुपयाचेसुद्धा अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून मिळत नाही. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत केंद्राकडून ५० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध होते. असे असतांना इतर सर्व वर्गांच्या बाबतीत थकबाकी अदा करण्याबाबतच्या तरतुदी समाविष्ट करून शासननिर्णय निर्गमित करण्यात आले. मात्र विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत तसे करण्यात आलेले नाही. हे कृत्य भेदभाव करणारे असून भारतीय घटनेच्या कलम १४ चा भंग करणारे आहे. यासंदर्भात याचिका मा. मुंबई उच्च न्यायालयासमोर दाखल करण्यात यावी व **याबाबतची जबाबदारी 'बुक्टू'ने पार पाडावी असा निर्णय घेण्यात आलेला आहे.**"

**"(iv)** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्समध्ये राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने शासननिर्णय काढून दुरुस्त्या करणे हे पूर्णपणे बेकायदेशीर व घटनाबाह्य आहे. घटनात्मक मर्यादांचे उल्लघन करणारे व कमालीच्या शिरजोरपणाचे (Gross insubordination) कृत्य होय. यासंदर्भात याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर दाखल करण्यात यावी व **याबाबतची कार्यवाही नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाने (NUTA) पार पाडावी.**"

**(B)** उपरोक्त ठरावात नमूद करण्यात आल्याप्रमाणे नुटाच्या वतीने मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर दिनांक २७ डिसेंबर २०१९ रोजी याचिका दाखल करण्यात आली असून या याचिकेचे क्रमांकन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोरील W.P. No. 701 of 2020 असे झालेले आहे. सदरहू याचिकेचे तपशील पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत. या याचिकेमध्ये :-

**(१) अर्जदार (Petitioners) :** Nagpur University Teachers Association, through its President, Shri Pravin Balisingh Raghuwanshi, Aged about 51 years, Occu: Service, R/o. Buty Plot, Near Mahajanwadi, Rajapeth, Amravati 444605.

**(२) गैरअर्जदार (Respondents) :** (1) The Union of India, Through its Secretary, Department of Human Resource of Govt. of India, Shastri Bhavan, New Delhi. (2) The University Grants Commission (UGC) Bahadurshah Zafar Marg, New Delhi. (3) The State of Maharashtra Through its Secretary Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai-440032. (4) The Director of Higher Education, State of Maharashtra, Central Building, Pune-01.

**(3) Prayer Clause :** या याचिकेमध्ये एकूण २९ परिच्छेद असून विनंतीचा परिच्छेद (Prayer Clause) पुढीलप्रमाणे आहे :- **"PRAYER :** It is, therefore, most humbly and respectfully prayed that this Hon'ble Court may kindly be pleased to issue suitable writ, order or direction and be pleased to..... **(a)** command the respondent no. 3- the State of Maharashtra to implement the UGC Regulation-2018 (Annexure-C) in its letters and spirit; **(b)** command the respondent no. 2 - UGC to take steps against the respondent no. 3 - the State of Maharashtra for getting implemented its Regulation-2010 (Annexure-C) within a stipulated period; **(c)** hold and declare that the part of the impugned Government Resolution dated 08.03.19 and Corrigendum dated 10.05.19 issued by the respondent no.3- the State of Maharashtra (Annexure-E) to the extent it contradicts to the UGC Regulation-2018 (Annexure-C) is illegal and unenforceable; **(d)** declare that once the respondent no.3- the State of Maharashtra has adopted the UGC Regulations-2018 (Annexure-C) it is mandatory and binding upon the State to implement it completely and without any modifications; **(e)** grant interim relief by directing the respondent no.3-the State of Maharashtra to not to take any action contrary to any Provision of the Regulation-2018 (Annexure-C) throughout the State of Maharashtra during the pendency of the petition; **(f)** to grant any other relief as deems fit in the interest of justice.

**(४) सहपत्रे (Annexure) :** या याचिकेसोबत एकूण १३ सहपत्रे जोडलेली असून ती पुढीलप्रमाणे आहेत :- **"List of Annexure : (A)** Copy of letter of the Government of India about the acceptance of scheme without any modification dated 02.11.17 **(B)** Copy of letter issued by the UGC about the Scheme of the Government of India to the State Governments dated 31.01.18 **(C)** Copy of the UGC Regulation-2018 **(D)** Copy of the relevant Cabinet decision about acceptance of the recommendations of 7th Pay Commission dated 05.03.19. **(E)** Copies of the GR and Corrigendum issued by the State regarding 7th Pay Commission dated 08.03.19 and 10.05.19 **(F)** Copy of the comparative chart prepared by the petitioner in order to show contradiction or omission between UGC Regulation and the GR of the State. **(G)** Copies of some of the Directions issued by the Universities. **(H)** Copy of the letter issued by the UGC directing to follow guidelines in letters and spirit dated 04.06.19. **(I)** Copy of the representation submitted by the Maharashtra Federation of University and College Teachers Organisation, Mumbai to the UGC dated 13.07.19. **(J)** Copy of the representation submitted by the petitioner to the UGC dated 30.07.19 **(K)** Copy of communication of UGC to the Government of Madhya Pradesh directing to take step for implementation of the UGC Regulations had deviated from the UGC Regulations-2018 dated 03.09.19. **(L)** Copy of the clarification given by the UGC dated September 2015. **(M)** Copies of the representations submitted by the petitioner to the UGC and to the State of Maharashtra dated 15.11.19

(५) या याचिकेतील परिच्छेद १० पुढीलप्रमाणे आहे :-

"10. It is humbly submitted that on comparing between UGC Regulation and the Policies of State as per GRs dated 08.03.19 and 10.05.19, there are various contradictions and omissions which are not in favour of teachers or depriving them of the benefits. Following are some the provisions of the UGC Regulations which are either omitted or modified by the State of Maharashtra by issuing policy of 7th Pay Commission as per GRs 08.03.19 and 10.05.19.

**(i)** UGC selection committee for the selection of Pro Vice-Chancellor and Vice-Chancellor is not followed. **(ii)** No UGC nominee in assessment of Principal for second term. **(iii)** Two cadres of Principal introduced. **(iv)** Vice-Principals position is denied. **(v)** Incentive/ increments for M. Phil. / Ph.D. acquired on or after 01/01/2016 are denied. **(vi)** Provision to fill all sanctioned posts immediately is omitted. **(vii)** Regulation for Contractual appointments (procedure, Salary) is omitted. **(viii)** Provision for counting of past service, including Contract service is omitted. **(ix)** Provision on Work load and Teaching days are omitted. **(x)** Principal's Scale, not on par with Professor's scale. **(xi)** UGC's Leave package is omitted. **(xii)** Career Advancement from date of Interview instead of date of eligibility. **(xiii)** Extension to complete Refresher Course / Orientation Course till 31/12/ 2018 is denied. **(xiv)** Provision to count period of active service spent on pursuing Research Degree, teaching experience is omitted. **(xv)** Additional Increment for bunching of more than 2 stages is denied. etc. etc.

Further the petitioner also has prepared a comparative chart to show these contradictions for the kind perusal of this Hon'ble Court and the same is annexed herewith and marked as ANNEXURE-F."

**(६)** सदरहू याचिकेची सुनावणी मा.नागपूर खंडपीठासमोर दिनांक ४ फेब्रुवारी २०२० रोजी झाली. त्या दिवशीच्या आदेशपत्रातील *(P17NB2020)* पहिला परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :-

"The Government Resolution dated 08.03.2019 and Corrigendum dated 10.05.2019 issued by the Higher & Technical Education Department (H&TED) are contrary to resolution dated 05.03.2019 passed by the Cabinet. The inconsistency with the decision of the Cabinet and Government Resolution is pointed out in para no. 10 of the petition."

दिनांक ४ फेब्रुवारी २०२० रोजी न्यायालयामध्ये झालेल्या कामकाजामध्ये सर्व प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे ३१ मार्च २०२० पर्यंत दाखल करावे असे मा.न्यायालयाने आदेशित केलेले आहे. त्या दिवशीचे कामकाज समाविष्ट असलेले मा.उच्च न्यायालयाचे आदेशपत्र याच अंकात प्रसृत *(P17NB2020)* केलेले आहे.

**(C)** उपरोक्त ठरावात नमूद करण्यात आल्याप्रमाणे 'बुक्टु'च्या वतीने मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य खंडपीठासमोर दिनांक २० नोव्हेंबर २०१९ रोजी याचिका दाखल करण्यात आली असून या याचिकेचे क्रमांकन मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य खंडपीठासमोरील W.P. No. (L) 3334 of 2019 असे झालेले आहे. सदरहू याचिकेचे तपशील पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत. या याचिकेमध्ये :-

**(१) अर्जदार (Petitioners) :** Maharashtra Federation of University and College Teachers' Organization Through its President, Having its office at Vidyapeeth Vidyarthi Bhavan, B Road, Churchgate, Mumbai 400 020.

**(२) गैरअर्जदार (Respondents) :** (1) State of Maharashtra, Through the Principal Secretary, Finance Department, Mantralaya, Mumbai-400032 (2) State of Maharashtra, Through the Principal Secretary, Higher & Technical Education Department, Mantralaya Annex, Mumbai-400032 (3) The Director of Higher Education, Maharashtra State, Central Building, Pune, District - Pune. (4) Union of India, Through the Ministry of Human Resource Develompment, 1, West Block, Rama Krishna Puram, New Delhi, Delhi 110066 (5) University Grants Commission, Bahadur Shah Zafar Marg, New Delhi - 110002.

**(3) Prayer Clause :** या याचिकेमध्ये एकूण २६ परिच्छेद असून विनंतीचा परिच्छेद (Prayer Clause) पुढीलप्रमाणे आहे :-

26. The Petitioner prays as under :

**(a)** The Hon'ble Court be pleased to issue a Mandamus or a Writ in the nature of Mandamus or any other appropriate Writ, Direction or Order directing the Respondent No. 1 to 3 to forthwith release the arrears of salaries to the Teachers of Non-Agricultural Universities, National Law University, Affiliated Colleges, Government Colleges/Institutes for the period between 1st January 2016 and 31st July 2019; **(b)** This Hon'ble Court be pleased to issue a Writ of Mandamus or a Writ in the nature of Mandamus or any other appropriate Writ, Direction or Order directing Respondent No. 2 to modify the Government Resolution dated 8th March 2019 to include a consolidated timeline and mechanism for the payment of arrears of salaries to the Teachers of in Non-Agricultural Universities, National Law University, Affiliated Colleges, Government Colleges/ Institutes for the period between 1st January 2016 and 31st July 2019; **(c)** That pending the hearing and final disposal of the Petition Respondent No. 1 to 3 be directed to release the arrears of salaries to the Teachers of in Non-Agricultural Universities, National Law University, Affiliated Colleges, Government Colleges/Institutes for the period between 1st January 2016 and 31st July 2019; **(d)** For ad-interim reliefs in terms of prayer (c) above, **(e)** For costs of this petition, **(f)** For such other and further order as this Court deems fit in the facts and circumstances of this case.

**(४) सहपत्रे (Exhibit) :** या याचिकेसोबत एकूण ७ सहपत्रे जोडलेली असून ती पुढीलप्रमाणे आहेत :- **List of Exhibit : (A)** Copy of Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Higher Education's Notification dated 2nd November 2017. **(B)** Copy of corrigendum dated 8th November 2017. **(C)** A copy of letter dated 31st January 2018 addressed to Respondent No. 2 from Respondent No. 5 Commission. **(D)** A copy of Respondent No. 2's Government Resolution dated 8th March 2019. **(E)** A copy of the said communication from the Chief Minister's Office. **(F)** A copy of the Petitioner's resolution dated 21st April 2019 along with the covering letter dated 29th April 2019. **(G)** A copy of order dated 17th January 2013 passed by the Hon'ble Allahabad High Court in Writ Petition No. 64068 of 2011.

**(५)** या याचिकेतील परिच्छेद ७ व १६ पुढीलप्रमाणे आहेत :-

"7. Petitioner has approached the Hon'ble High Court with following grievances :

i. That Respondent No. 1 to 3 has arbitrarily, unlawfully and illegally denied arrears of salaries to college professors as payable to college professors pursuant to the recommendations of the 7th Pay Commission w.e.f. 01.01.2016 as the Government Resolution dated 8th March 2019 despite fixing liability for the payment of arrears in Clause 25(iv) does not provide for a timeline or mechanism for the payment of the said arrears of salaries."

"16. The Petitioner states and submits that the present issue is no longer *res integra* in light of the order dated 17th January 2013 passed by the Hon'ble Allahabad High Court in Writ Petition No. 64068 of 2011. It has been held that that once the State Government has accepted the liability to pay the said arrears, it is the bounden duty of the State to act thereupon. A copy of order dated 17th January 2013 passed by the Hon'ble Allahabad High Court in Writ Petition No. 64068 of 2011 is annexed and marked as **Exhibit G."**

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2018-20 (Uploaded on www.nuta.in on 03.03.2020) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.03.2020**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,......................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................